दैनिक
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
वैभव विवेक स्वामी
सपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष - ६ वे अंक -२७६ सोमवार दि.१५ जुन २०२६ 98 22 62 85 21 आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रू । पाने ४
Beed Daily Marathi Year-6th Issue-276 Monday, Dt.15 June 2026 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

# अन्नदात्यासाठी आ.रोहित पवारांचा अन्नत्याग

## पंढरपूरच्या भूमीत सरकार विरोधातील निर्णायक एल्गार

पंढरपूर । विशेष प्रतिनिधी

विठ्ठल-रुक्मिणीच्या पावन नगरी पंढरपूर येथे राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट)चे आमदार रोहित पवार यांनी सुरू केलेले 'अन्नदात्यासाठी अन्नत्याग' आंदोलन आता राज्याच्या राजकारणाचा केंद्रबिंदू बनले आहे. शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी, पीक नुकसानीची भरपाई, हमीभाव आणि कृषी धोरणातील त्रुटी दूर करण्यासाठी सुरू झालेले हे आंदोलन तिसऱ्या दिवशीही कायम असून सरकारवर दबाव वाढत आहे.

आंदोलनाची ठिणगी कशी पडली..?

राज्य मंत्रिमंडळाने अलीकडेच सुमारे ३६ हजार कोटी रुपयांच्या कर्जमाफी योजनेला मंजुरी दिली. मात्र या योजनेतील अटी अत्यंत कठोर असून लाखो शेतकरी लाभापासून वंचित राहतील, असा आरोप रोहित पवार यांनी केला. सरकारने कर्जमाफी जाहीर केली असली तरी प्रत्यक्षात बहुतांश शेतकऱ्यांना त्याचा लाभ मिळणार नाही, अशी त्यांची भूमिका आहे. याच निषेधार्थ त्यांनी १२ जूनपासून पंढरपूर येथे बेमुदत अन्नत्याग आंदोलन सुरू केले.



### यावर सरकारची भूमिका काय..?

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारने कर्जमाफी योजना ऐतिहासिक असल्याचा दावा केला आहे. सरकारच्या मते लाखो शेतकऱ्यांना या योजनेचा फायदा होणार आहे. मात्र विरोधकांचा आरोप आहे की अटींमुळे प्रत्यक्ष लाभार्थ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात कमी होईल. अद्याप सरकारने अटी शिथिल करण्याबाबत कोणतीही अधिकृत घोषणा केलेली नाही. मात्र आंदोलनामुळे प्रशासन आणि राजकीय पातळीवर हालचाली वाढल्याचे दिसून येत आहे.

### तीन दिवसांत नेमके काय घडले..?

### पहिला दिवस : संघर्षाची घोषणा

आंदोलनाच्या प्रारंभी रोहित पवार यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सरकारला थेट लक्ष्य केले. सरसकट कर्जमाफीशिवाय आंदोलन मागे घेणार नाही, अशी स्पष्ट भूमिका त्यांनी जाहीर केली. राज्यभरातील शेतकरी संघटना, कार्यकर्ते आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी पंढरपुरात दाखल होऊ लागले.

दुसरा दिवस : विरोधकांचा वाढता पाठिंबा...

आंदोलनाला काँग्रेसने जाहीर पाठिंबा दिला. महाराष्ट्र काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनीही पंढरपूरात येऊन आंदोलनात सहभागी होण्याची घोषणा केली. महाविकास आघाडीतील विविध नेत्यांनी आंदोलनाला नैतिक पाठिंबा दिल्याने हा मुद्दा राज्यव्यापी बनला.

तिसरा दिवस : तब्येत खालावली, भूमिका कायम..

### राजकीय आणि सामाजिक परिणाम..?

पंढरपूरच्या भूमीत सुरू झालेले हे आंदोलन आता राज्य सरकारच्या कृषी धोरणाची कसोटी ठरत आहे. एकीकडे सरकार कर्जमाफी योजना पुरेशी असल्याचे सांगत आहे, तर दुसरीकडे रोहित पवार आणि विरोधक शेतकऱ्यांना न्याय मिळालेला नसल्याचा दावा करत आहेत. आगामी काही दिवसांत सरकार आणि आंदोलनकर्त्यांमध्ये चर्चा होऊन तोडगा निघतो की आंदोलन आणखी तीव्र होते, याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

(पान २ वर...



बीड :- परळी कोर्टाचा स्थगिती (स्टे) आदेश लागू असतानाही सिरसाळ येथील वादग्रस्त आणि बोगस ताबा मिळवलेल्या जागेवर राजकीय दलालांच्या बळावर सुरू असलेले हे अनधिकृत बांधकाम.

# सराईत गुंडाला एमपीडीएचा दणका..!

## सार्वजनिक सुव्यवस्थेला धोका ठरणारा कलीम शेख हर्सूल कारागृहात स्थानबद्ध

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात सार्वजनिक सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी आणि गुंडगिरीला आळा घालण्यासाठी जिल्हा पोलीस प्रशासनाने आणखी एक कठोर पाऊल उचलत सराईत गुन्हेगार शेख कलीम शेख जमाल (वय ४१, रा. इस्लामपुरा, पेठ बीड) याच्याविरुद्ध महाराष्ट्र धोकादायक क्रियाकलाप प्रतिबंधक कायदा अंतर्गत कारवाई करून त्यास हर्सूल केंद्रीय कारागृह, छत्रपती संभाजीनगर येथे स्थानबद्ध करण्यात आले आहे.

बीड जिल्ह्यातील कायदा व

(पान २ वर...



### गुन्हेगारांना स्पष्ट इशारा...


बीड जिल्हा पोलीस प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, वाळू माफिया, अवैध गुटखा व्यवसाय करणारे, जीवनावश्यक वस्तूंचा काळाबाजार करणारे, जातीय किंवा धार्मिक तेढ निर्माण करणारे समाजकंटक, खंडणीखोर आणि दादागिरी करणाऱ्या सराईत गुंडांविरुद्ध यापुढेही एमपीडीएसारख्या कठोर कायद्यांतर्गत कारवाई सुरूच राहणार आहे.

## शिवाजीनगर पोलिसांच्या सापळ्यात दोन महिला रंगेहात जेरबंद..!

# बीड बसस्थानकावर महिलांच्या वेषातील चोरट्यांचा धुमाकूळ अखेर संपला

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील मध्यवर्ती बस स्थानक परिसरात गेल्या काही दिवसांपासून महिला प्रवाशांच्या पर्स, मोबाईल, दागिने आणि रोकड चोरीच्या घटनांनी नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. गर्दीचा फायदा घेत महिलांनाच लक्ष्य करणाऱ्या चोरट्या टोळीने अनेकांना आर्थिक फटका दिला होता. मात्र शिवाजीनगर पोलिसांच्या



सतर्कतेमुळे या टोळीच्या मुसक्या आवळण्यात अखेर यश आले असून दोन महिला आरोपींना रंगेहात अटक करण्यात आली आहे.

या कारवाईमुळे बसस्थानकावरून प्रवास करणाऱ्या हजारो महिला प्रवाशांनी सुटकेचा निश्वास सोडला असून, पोलिस आहेत म्हणून आम्ही सुरक्षित आहोत, अशी भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे.

पोलिसांची सतर्कता आणि धाडसामुळे गुन्हा उघडकीस..

बीड जिल्ह्याच्या प्रभारी पोलीस अधीक्षक चेतना तिडके, अप्पर पोलीस अधीक्षक समीर

(पान २ वर...

### महिला जमादार मीरा पाटील यांची भूमिका ठरली निर्णायक..

या संपूर्ण कारवाईत महिला पोलीस जमादार मीरा पाटील यांनी दाखवलेले धैर्य, चिकाटी आणि तपासातील बारकाई विशेष कौतुकास पात्र ठरली आहे. संशयित महिलांच्या हालचालींवर लक्ष ठेवणे, माहिती संकलन करणे आणि गुन्ह्याचा छडा लावण्यासाठी केलेल्या अथक प्रयत्नांमुळेच या टोळीपर्यंत पोलीस पोहोचू शकले.त्यांच्या कामगिरीमुळे केवळ एक गुन्हा उघड झाला नाही, तर भविष्यात अनेक निष्पाप प्रवाशांचे नुकसान टळण्यास मदत झाली आहे.

### 'महिला असल्याने संशय येणार नाही' हाच बनला गुन्ह्याचा आधार..

तपासा दरम्यान या महिला आरोपींची कार्यपद्धती धक्कादायक असल्याचे समोर आले. सामान्य वेशात आणि अत्यंत साधेपणाने वावरणाऱ्या या महिला गर्दीत मिसळून जात असत. बसमध्ये चढताना किंवा उतरताना निर्माण होणाऱ्या गोंधळाचा फायदा घेत त्या महिलांच्या पर्स उघडणे, बॅग कापणे, मोबाईल आणि रोकड चोरणे अशा प्रकारे गुन्हे करत होत्या. विशेष म्हणजे महिला चोर असू शकत नाही या सर्वसामान्य समजुतीचा फायदा घेत त्या बिनधास्तपणे वावरत असल्याचे पोलिसांच्या तपासात स्पष्ट झाले आहे.

### गर्दीचा फायदा घेत महिलांनाच बनवत होत्या लक्ष्य..

१२ जून २०२६ रोजी दुपारी दीड ते सव्वादोन वाजण्याच्या सुमारास एक महिला प्रवासी बसमध्ये चढत असताना गर्दीचा फायदा घेत दोन संशयित महिलांनी तिला मुद्दाम धक्काबुक्की करण्यास सुरुवात केली. या गोंधळात त्यांनी तिच्या हातातील खाकी रंगाची पर्स हिसकावून पळून जाण्याचा प्रयत्न केला.मात्र प्रसंगावधान राखत पीडित महिलेने तात्काळ आरडाओरडा केला. तिच्या आवाजाने परिसरातील पोलीस कर्मचारी आणि सुरक्षा रक्षक सतर्क झाले. काही क्षणांतच दोन्ही महिलांचा पाठलाग करून त्यांना जागीच पकडण्यात आले. त्यांच्या ताब्यातून चोरीची पर्स आणि रोकड जप्त करण्यात आली.या प्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक १५२/२०२६ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### सुरक्षित बीडकडे आणखी एक पाऊल..

शिवाजीनगर पोलिसांच्या या धडक कारवाईमुळे बसस्थानक परिसरातील गुन्हेगारीला मोठा आळा बसण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. महिला प्रवाशांच्या सुरक्षेला प्राधान्य देत पोलिसांनी दाखवलेली तत्परता आणि जनतेने दाखवलेला विश्वास यामुळे बीड बसस्थानक अधिक सुरक्षित आणि भयमुक्त करण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल उचलले गेले आहे.

# ठाण्यात अवैध 'मिक्स हायड्रोकार्बन ऑईल' साठ्यावर धाड

## १.२० कोटींचा मुद्देमाल जप्त

ठाणे प्रतिनिधी

अंबरनाथ तालुक्यात उसाटणे परिसरात अवैधरित्या साठवून ठेवलेल्या 'मिक्स हायड्रोकार्बन ऑईल'च्या मोठ्या साठ्यावर राज्य दक्षता पथकाने रविवारी धडक कारवाई करत सुमारे एक कोटी २० लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणात संबंधित आरोपींविरुद्ध तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून, अवैध इंधन साठवणूक आणि काळाबाजाराविरोधातील ही महत्त्वपूर्ण कारवाई मानली जात आहे.

नियंत्रक शिधावाटप चंद्रकांत डांगे (भा.प्र.से.) यांना मिळालेल्या खात्रीशीर गुप्त माहितीच्या आधारे राज्य दक्षता पथकाने अंबरनाथ येथील उसाटणे भागातील न्यूओ लॉजिस्टिक पार्क परिसरात, राज्यस्तरीय प्लॉट क्रमांक २०

(पान २ वर...

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
Bureau of Indian Standards प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777
6 x 6.5



संपादकीय....

# सामूहिक शेती गरजेची

ग्रामीण भागातील वाढते स्थलांतर, शेतीकडे होणारे दुर्लक्ष आणि ओसाड पडणाऱ्या सुपीक जमिनी ही चिंतेची बाब बनली आहे. अशा परिस्थितीत गावातील शेतकऱ्यांनी एकत्र येऊन सामूहिक शेतीचा मार्ग स्वीकारल्यास उत्पादन, उत्पन्न आणि रोजगाराच्या संधी वाढू शकतात. सामूहिक शेती ही केवळ शेतीची पद्धत नसून गावाच्या शाश्वत विकासाचा प्रभावी पाया ठरू शकते.

मी माझ्या आयनल गावच्या प्राथमिक शाळेत शिकत असताना पांडुरंग साटम, विजय साटम, दशरथ दहिबावकर आणि शांताराम दहिबावकर यांच्या जमिनीवर सामूहिक पद्धतीने भातशेती केली जात असे. त्या काळात गावातील लोक एकमेकांना सहकार्य करत शेतीची सर्व कामे मिळून करायचे. त्यामुळे वर्षभर पुरेल इतके भात उत्पादन होत असे. मेहनतीमुळे तांदळाचे चार निर्मळ गोठे भरत आणि कुटुंबांची अन्नाची गरज सहज भागत असे. गावात एकोप्याचे वातावरण असल्याने शेती ही केवळ उपजीविकेचे साधन नसून सामाजिक बांधिलकीचे प्रतीक होती. मात्र आज परिस्थिती मोठ्या प्रमाणात बदललेली दिसते. अनेक शेतजमिनींवर काजू व आंब्याच्या बागा उभ्या राहिल्या आहेत, तर काही सुपीक जमीन ओसाड पडलेली दिसते. यामागे पावसाचा अनियमितपणा, मुलांचे शिक्षण, आरोग्य सुविधा आणि रोजगाराच्या शोधात होणारे स्थलांतर ही प्रमुख कारणे आहेत. अनेक कुटुंबे शहरांकडे वळल्याने गावातील घरे वर्षातील बहुतांश काळ बंद असतात.


परिणामी शेतीकडे दुर्लक्ष होत असून रानांची निगा राखली जात नाही. याचा परिणाम म्हणून माकडे, गवारेडे आणि बिबटे यांसारखे वन्यप्राणी लोकवस्तीत येऊ लागले आहेत. विशेषतः माकडांमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. काही ठिकाणी बंद घरांची कौले काढून माकडे घरात वास्तव्य करत असल्याचे चित्र दिसते. या अडचणींमुळे अनेक शेतकरी शेती सोडून शहरात नोकरी करण्यास प्राधान्य देत आहेत. एकेकाळी हिरवेगार दिसणारे वाफे आणि सडे आज विद्रूप अवस्थेत दिसतात.

अशा परिस्थितीत गावाच्या विकासासाठी सामूहिक शेती हा प्रभावी पर्याय ठरू शकतो. गावातील शेतकऱ्यांनी आपापसातील मतभेद बाजूला ठेवून एकत्र येणे आवश्यक आहे. सामूहिक शेतीमध्ये अनेक शेतकरी मिळून शेती करतात आणि उत्पादनाचे समप्रमाणात वाटप करतात किंवा जमीन मालकाला ठरलेला हिस्सा देऊन उर्वरित उत्पादन वाटून घेतात. आजही शेती मोठ्या प्रमाणात पावसावर अवलंबून आहे. पावसाने दडी मारल्यास शेतकऱ्यांचे मनोधैर्य खचते. मात्र सामूहिक शेतीमध्ये एकमेकांचा आधार मिळत असल्याने संकटांचा सामना करणे सोपे जाते. कामांची विभागणी झाल्याने श्रम कमी होतात, उत्पादन वाढते आणि नफा-तोट्यात सर्वांचा समान सहभाग राहतो. सर्वात महत्त्वाचे म्हणजे अशा पद्धतीमुळे गावातील सामाजिक ऐक्य, परस्पर विश्वास आणि नातेसंबंध अधिक दृढ होतात. सामूहिक शेतीमुळे गावातील अल्प व मध्यमभूधारक शेतकऱ्यांना फायदेशीर ठरते. याचा परिणाम त्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत होते. उत्पन्न वाढल्याने त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारल्याने ते आपला विकास करू शकतात. जर गावातील शेतकऱ्यांचा एकत्रितरीत्या अभ्यास केल्यास आपल्या राज्यातील प्रत्येक गावात सामुहिक शेतीची गरज आहे.

सामुहिक शेतीमुळे शेतकऱ्यांना बळकटी येते. एकत्रित शेती केल्याने शेतीशी अनुसरून अवजारे, बी-बियाणे, खते व कीटकनाशके जास्त खरेदी केल्याने त्याच्या उत्पादन खर्चात बचत होऊ शकते. हल्ली बैलजोडीने नांगरणी फार कमी प्रमाणात केली जाते. त्याच्याऐवजी ट्रॅक्टरने नांगरणी केली जाते. म्हणजे सामूहिक शेती करीत असताना ट्रॅक्टरचा वापर केल्याने इतर खर्च कमी होतो. एकटा शेतकरी असल्याने नेहमीच त्याला पाण्याची समस्या जाणवत असते. सामूहिक शेती केल्याने ठिबक सिंचन, शेततळी, नदीला केटी बंधारा याच्या सहाय्याने पाणीपुरवठा करू शकतो. म्हणजे जल संसाधनांचा प्रभावीपणे वापर करू शकतो. एका शेतकऱ्याकडे सर्वच कौशल्य असतात असे नाही तेव्हा एकत्रित शेती केल्याने प्रत्येकाजवळ असलेल्या कौशल्याचा योग्य प्रकारे वापर करू शकतो. तसेच एकजूट असल्याने कामाची श्रमविभागणी करू शकतात. जेव्हा सामूहिक शेती केली जाते तेव्हा त्या शेतमालाला चांगला भाव येतो. उत्पादित शेतमाल सरळ बाजारपेठेत नेला जातो.

# अवघ्या दोन तासांत मोबाईल हिसकावणाऱ्या सराईत टोळीला बेड्या

## शिवाजीनगर डीबी पथकाने महिलांना लक्ष्य करून शहरात धुमाकूळ घालणाऱ्या तिघा सराईत गुन्हेगारांच्या मुसक्या आवळल्या, ९ मोबाईल केले जप्त



बीड । प्रतिनिधी

शिवाजीनगर पोलीस ठाणे हद्दीत दिवसाढवळ्या महिलांच्या हातातील मोबाईल फोन हिसकावून नागरिकांमध्ये दहशत निर्माण करणाऱ्या तीन मोटारसायकलस्वार सराईत गुन्हेगारांना शिवाजीनगर पोलिसांच्या डीबी पथकाने अवघ्या दोन तासांत जेरबंद करून उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. आठवडाभरात गुन्हे उघडकीस आणण्याची ही शिवाजीनगर पोलिसांची दुसरी मोठी कारवाई ठरली असून, शहरातील गुन्हेगारीवर पोलिसांचा वचक कायम असल्याचे पुन्हा अधोरेखित झाले आहे.

महिलांनाच केले लक्ष्य..

दिनांक १४ जून रोजी आरोपींनी शहरातील विविध भागात महिलांना लक्ष्य करत एकामागून एक मोबाईल हिसकावण्याचे प्रकार घडवून आणले.

पहिली घटना

फिर्यादी अश्विनी कृष्णा सुर्वे या दीप हॉस्पिटलकडे जात असताना स्वराज्यनगर कमानीसमोर मोबाईलवर बोलत चालल्या होत्या. त्यावेळी मोटारसायकलवरील तिघा आरोपींपैकी एका आरोपीने त्यांच्या हातातील मोबाईल हिसकावून नेला.

दुसरी घटना..

मिराबाई बाळू मुळीक, रा. बडगुजर कॉलनी, जुना धानोरा रोड या आपल्या मैत्रिणींसह सरस्वती विद्यालय परिसरातून जात असताना आरोपींनी त्यांच्या हातातील मोबाईल जबरदस्तीने खेचून नेला.

तिसरी घटना..

के.एस.के. महाविद्यालय परिसरात एका नर्स महिलेच्या एप्रनच्या खिशात ठेवलेला मोबाईल आरोपींनी क्षणार्धात लंपास केला.

अवघ्या १५ ते २० मिनिटांच्या अंतराने घडलेल्या या सलग घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

पोलिसांची तात्काळ नाकाबंदी, आरोपी जेरबंद..

घटनांची माहिती मिळताच शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या डीबी पथकाने तातडीने हालचाली सुरू केल्या. विविध दिशांना पाच विशेष पथके रवाना करण्यात आली तर शहरातील महत्त्वाच्या मार्गांवर नाकाबंदी करण्यात आली.

तांत्रिक विश्लेषण, गोपनीय माहिती आणि पथकाच्या सतर्कतेच्या जोरावर आरोपींचा माग काढण्यात आला. अखेर अवघ्या दोन तासांच्या आत तिन्ही आरोपींना ताब्यात घेण्यात पोलिसांना यश आले.

अटक आरोपी..

आवेश खान खाजा शेख (वय २२), रा. कानडी रोड, केज

गणेश श्रीराम मुंडे, रा. किल्ले धारूर

ऋषिकेश लक्ष्मण वायबसे (वय १९), रा. कासारी, ता. केज

नऊ मोबाईल जप्त,आणखी गुन्हे उघड होण्याची शक्यता

चौकशी दरम्यान आरोपींनी महिलांना लक्ष्य करून मोबाईल चोरी केल्याची कबुली दिली आहे. त्यांच्या ताब्यातून एकूण ९ मोबाईल फोन जप्त करण्यात आले आहेत. जप्त मोबाईल इतर कोणत्या गुन्ह्यांतील आहेत याबाबत तपास सुरू असून आणखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

सराईत गुन्हेगारांची टोळी

तिन्ही आरोपी हे अभिलेखावरील सराईत गुन्हेगार असून त्यांच्यावर यापूर्वी विविध प्रकारचे गुन्हे दाखल आहेत. मोबाईल चोरी करून त्याचे सुटे भाग विक्री करणे हा त्यांचा मुख्य व्यवसाय असल्याची माहिती तपासात समोर आली आहे. परस्परांतील मैत्री आणि गुन्हेगारी पार्श्वभूमीचा फायदा घेत त्यांनी संघटित पद्धतीने चोरीचे प्रकार सुरू ठेवले होते.

नवीन कायद्यांतर्गत कठोर कारवाई

सदर आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहितेतील (इछड) संघटित गुन्हेगारी व चोरीसंदर्भातील लागू तरतुदींनुसार कठोर कारवाई करण्याची प्रक्रिया सुरू आहे. न्यायालयात भक्कम पुरावे सादर करून आरोपींना कठोर शिक्षा व्हावी यासाठी पोलीस पाठपुरावा करणार असल्याचे सूत्रांनी सांगितले.

वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वी कारवाई..

ही कारवाई बीड जिल्ह्याच्या प्रभारी पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके, अप्पर पोलीस अधीक्षक समीर शेख, उपविभागीय पोलीस अधिकारी वेंकटराम तथा शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.कारवाईत पथकप्रमुख सपोनि दीपक लंके, पोउनि काटकर, पोउनि सागर सोन्ने, तसेच रवी आघाव, ज्ञानेश्वर मराडे, बाळू राहाडे, सचिन आगलावे, अशोक राडकर, दिलीप राठोड, अनिल घटमाळ आणि शुभम सोनवणे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# आदर्श माता कै.विठाबाई बाबुराव गर्जे यांच्या दशक्रिया विधीनिमित्त भावपूर्ण श्रद्धांजली

## शंभर वर्षांच्या संस्कारसंपन्न जीवनप्रवासाचा कृतार्थ पूर्णविराम

आष्टी - कुटुंबाचा आधारवड, संस्कारांचा अखंड झरा, प्रेमाचे अथांग सागर आणि त्यागाची मूर्ती अशी ओळख असलेल्या ज्येष्ठ माता कै. विठाबाई बाबुराव गर्जे यांच्या निधनाने पाटसरा परिसरावर दुःखाची छाया पसरली आहे. शंभर वर्षांचे प्रदीर्घ, कर्तृत्ववान आणि मूल्यनिष्ठ जीवन जगून त्यांनी आपल्या जीवनप्रवासाचा कृतार्थ पूर्णविराम घेतला. त्यांच्या जाण्याने केवळ गर्जे परिवाराचे मातृछत्र हरपले नाही, तर संपूर्ण परिसराने एक आदर्श माता, संस्कारक्षम व्यक्तिमत्त्व आणि समाजाला दिशा देणारी ज्येष्ठ मार्गदर्शक गमावली आहे.



आई हा शब्द उच्चारताच मायेची ऊब, प्रेमाची सावली आणि त्यागाची मूर्ती डोळ्यांसमोर उभी राहते. कै. विठाबाई गर्जे यांचे संपूर्ण जीवन हे याच मातृत्वाच्या सर्वोच्च मूल्यांचे जिवंत उदाहरण होते. स्वतःच्या सुख-दुःखाचा विचार न करता कुटुंबाच्या आनंदासाठी आणि मुलांच्या उज्ज्वल भविष्यासाठी आयुष्यभर झटणाऱ्या या माऊलीने आपल्या कष्टातून, त्यागातून आणि संस्कारातून एक आदर्श परिवार घडविला. त्यांच्या जीवनातील प्रत्येक क्षण हा कुटुंबासाठी, समाजासाठी आणि धर्मासाठी समर्पित होता.

ग्रामीण भागातील अत्यंत साध्या परिस्थितीत संसाराची जबाबदारी सांभाळताना त्यांनी अनेक संकटांना तोंड दिले. मात्र परिस्थिती कितीही कठीण असली तरी त्यांनी कधीही धैर्य सोडले नाही. संकटांशी दोन हात करताना त्यांनी संयम, चिकाटी आणि कर्तव्यनिष्ठा यांचे दर्शन घडवले. त्यांच्या जीवनाचा प्रत्येक अध्याय हा संघर्षातून यश मिळविण्याची प्रेरणा देणारा आहे. कष्टाला पर्याय नाही, प्रामाणिकपणा हीच खरी संपत्ती आहे आणि माणुसकी हा जीवनाचा पाया आहे, हे त्यांनी आपल्या कृतीतून दाखवून दिले.

स्वातंत्र्यसैनिक तथा ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते स्व. बाबुराव गर्जे यांच्या जीवनप्रवासात त्यांनी खंबीरपणे साथ दिली. संसाराची धुरा सांभाळत असतानाच सामाजिक जाणीवा जपणाऱ्या या दाम्पत्याने आपल्या कार्यातून समाजासमोर आदर्श निर्माण केला. घरातील प्रत्येक जबाबदारी समर्थपणे पेलत त्यांनी मुलांना उत्तम संस्कार दिले आणि समाजातील चांगल्या मूल्यांचे बीजारोपण केले. त्यांच्या हातून घडलेल्या संस्कारांचे प्रतिबिंब आज त्यांच्या पुढील पिढ्यांमध्ये स्पष्टपणे दिसून येते. मुलांना प्रामाणिकपणा, शिस्त, मेहनत, मोठ्यांचा आदर आणि समाजसेवेची भावना त्यांनी दिली. म्हणूनच आज गर्जे परिवार समाजात मानाचे स्थान प्राप्त करू शकला आहे. मुलगा, मुलगी, नातवंडे, यांच्यावर त्यांनी केलेले संस्कार हेच त्यांच्या आयुष्याचे सर्वात मोठे यश मानले जात आहे.

कै. विठाबाई गर्जे यांची धार्मिक वृत्ती आणि अध्यात्मिक निष्ठा विशेष उल्लेखनीय होती. भजन, कीर्तन, हरिनाम सप्ताह, मंदिरातील विविध धार्मिक कार्यक्रम, उत्सव आणि समाजप्रबोधनपर उपक्रमांमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग असायचा. धर्म म्हणजे केवळ पूजा-अर्चा नसून माणुसकी, परोपकार, सदाचार आणि सेवाभाव आहे, ही शिकवण त्यांनी आपल्या जीवनातून दिली. त्यामुळेच त्यांच्या सहवासात आलेल्या प्रत्येक व्यक्तीच्या मनात त्यांच्याबद्दल आदर आणि आपुलकीची भावना निर्माण झाली होती.

त्यांच्या प्रेमळ स्वभावामुळे आणि माणसे जोडण्याच्या गुणामुळे त्या केवळ आपल्या कुटुंबापुरत्या मर्यादित राहिल्या नाहीत, तर संपूर्ण गावाच्या आई बनल्या होत्या. गावातील कोणत्याही कुटुंबावर संकट आले की त्यांना धीर देण्यासाठी त्या पुढे असत. कोणत्याही व्यक्तीला मदतीची गरज भासली तर त्यांच्या शब्दातून आधार आणि कृतीतून मदत मिळत असे. त्यामुळेच त्यांच्या निधनाची बातमी समजताच पाटसरा परिसरातील अनेकांचे डोळे पाणावले.

दि. ७ जून २०२६ रोजी त्यांनी अखेरचा श्वास घेतला आणि एका युगाचा अंत झाल्याची भावना सर्वत्र व्यक्त झाली. त्यांच्या निधनानंतर असंख्य नातेवाईक, मित्रपरिवार, ग्रामस्थ आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांच्या निवासस्थानी भेट देऊन श्रद्धांजली अर्पण केली. प्रत्येकाच्या ओठांवर त्यांच्या प्रेमळ स्वभावाच्या, त्यागाच्या आणि माणुसकीच्या आठवणी होत्या.

ज्येष्ठ कीर्तनकार ह.भ.प. आसाराम बडे महाराज यांनी श्रद्धांजली व्यक्त करताना म्हटले आहे की, गर्जे कुटुंबाच्या मंदिरातील त्या एक पवित्र मूर्ती होत्या. या एका वाक्यात त्यांच्या संपूर्ण व्यक्तिमत्त्वाचे वर्णन सामावलेले आहे. कुटुंबाला एकत्र ठेवणारी, संस्कारांची जोपासना करणारी आणि प्रेमाचा झरा अखंड वाहता ठेवणारी ती एक पवित्र शक्ती होती.

त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ मंगळवार दि. १६ जून २०२६ रोजी सकाळी ९ वाजता पाटसरा (ता. आष्टी) येथे दशक्रिया विधी व श्रद्धांजली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्त धार्मिक विधी, प्रवचन सेवा आणि सामूहिक श्रद्धांजली अर्पण करण्यात येणार आहे. कार्यक्रमात श्रीक्षेत्र गणेशगड संस्थानचे अध्यक्ष महंत काशिनाथ महाराज यांचे विशेष प्रवचन आयोजित करण्यात आले असून जीवनमूल्ये, संतविचार, अध्यात्म, माता-पित्यांचे महत्त्व आणि मानवी जीवनातील कर्तव्ये यावर ते मार्गदर्शन करणार आहेत.

कै. विठाबाई बाबुराव गर्जे यांच्या पश्चात श्री. अण्णासाहेब बाबुराव गर्जे, पाटसरा गावचे माजी सरपंच श्री. सुंदरलाल बाबुराव गर्जे, सौ. इंदुबाई श्रीराम गीते, सौ. रुख्मिणी निवृत्ती जायभाये, नातवंडे तसेच मोठा आप्तपरिवार असा परिवार आहे. त्यांच्या निधनामुळे संपूर्ण परिवार दुःखसागरात असला तरी त्यांनी दिलेले संस्कार, शिकवलेली जीवनमूल्ये आणि जपलेली माणुसकी हीच त्यांच्या स्मृतींची अमूल्य ठेव ठरणार आहे. आज त्या आपल्यात नसल्या तरी त्यांच्या आठवणी, त्यांचे विचार, त्यांचे आशीर्वाद आणि त्यांनी घडविलेला संस्कारांचा वारसा कायम जिवंत राहणार आहे. त्यांनी आयुष्यभर जपलेली प्रेमाची नाती, धर्मनिष्ठा, परोपकाराची वृत्ती आणि माणुसकीची शिकवण पुढील अनेक पिढ्यांना प्रेरणा देत राहील. अशा या त्यागमूर्ती, संस्कारसम्राज्ञी आणि आदर्श मातेला भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करताना प्रत्येकाच्या मनातून एकच भावना व्यक्त होत आहे आई गेली, पण तिचे संस्कार अमर झाले; माऊली गेली, पण तिच्या मायेची सावली कायम राहिली. कै. विठाबाई बाबुराव गर्जे यांना विनम्र अभिवादन व भावपूर्ण श्रद्धांजली!

**शब्दांकन...**

**- राजेंद्र लाड,आष्टी**

**(९४२३१७०८८५)**

पान १ वरून...

**अन्नदात्यासाठी आ.रोहित...**

सलग उपोषणामुळे रोहित पवार यांची प्रकृती खालावल्याची माहिती समोर आली. वैद्यकीय तपासणी करण्यात आली. काही मंत्र्यांनी दूरध्वनीवरून त्यांची विचारपूस केली. मात्र शेतकऱ्यांना न्याय मिळेपर्यंत आंदोलन सुरूच राहील, असा निर्धार त्यांनी पुन्हा व्यक्त केला.

कोणकोणाचा पाठिंबा..?

राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)चे राज्यभरातील पदाधिकारी व कार्यकर्ते,काँग्रेस पक्षाचा अधिकृत पाठिंबा,विविध शेतकरी संघटना

मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र आणि विदर्भातील शेतकरी प्रतिनिधी

महाविकास आघाडीतील अनेक नेत्यांचा नैतिक पाठिंबा

आंदोलनस्थळी दररोज शेकडो शेतकरी भेट देऊन समर्थन दर्शवत आहेत. अनेकांनी हे आंदोलन केवळ राजकीय नसून शेतकऱ्यांच्या अस्तित्वाच्या लढ्याचे प्रतीक असल्याचे म्हटले आहे.

आंदोलनाचा मुख्य हेतू...

रोहित पवार यांच्या आंदोलनाचा केंद्रबिंदू हा केवळ कर्जमाफी नसून राज्यातील कृषी धोरणाचा पुनर्विचार हा आहे. शेतमालाला हमीभाव, पीकविमा दाव्यांची तातडीने पूर्तता, वीजपुरवठा, दुष्काळग्रस्तांना मदत आणि कर्जाच्या ओझ्याखाली दबलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देणे या प्रमुख मागण्या आहेत.

**सराईत गुंडाला...**

सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी सुरू केलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत ही महत्त्वपूर्ण कारवाई करण्यात आली असून, जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी विवेक जॉन्सन यांनीही यास मान्यता दिली आहे.

गुन्हेगारीचा प्रदीर्घ इतिहास

शेख कलीम शेख जमाल याच्याविरुद्ध शिवाजीनगर, बीड शहर आणि पेठ बीड पोलीस ठाण्यांमध्ये गंभीर स्वरूपाचे अनेक गुन्हे दाखल आहेत. शासकीय कर्मचाऱ्यांवर हल्ले करणे, जीवे मारण्याचा प्रयत्न, जबरी चोरीचा प्रयत्न, सरकारी कामकाजात अडथळा निर्माण करणे, सार्वजनिक मालमत्तेची तोडफोड, नागरिकांना धमकावणे आणि मारहाण करणे अशा स्वरूपाच्या गुन्ह्यांमुळे त्याची परिसरात दहशत निर्माण झाली होती.विशेष म्हणजे, त्याच्यावर यापूर्वी प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली होती. मात्र त्याच्या वर्तणुकीत कोणताही बदल झाला नाही. उलट तो अधिक आक्रमक होत सार्वजनिक शांततेसाठी गंभीर धोका ठरत असल्याचे पोलिसांच्या तपासात स्पष्ट झाले.

जनतेमध्ये भीतीचे वातावरण..

सन २०२३ पासून सातत्याने गुन्हेगारी कृत्ये करणाऱ्या या आरोपीच्या कारवायांमुळे सामान्य नागरिक, व्यापारी तसेच शासकीय कर्मचारी यांच्यामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. अनेकदा लोकांनी भीतीपोटी पुढे येण्यास टाळाटाळ केल्याची नोंद पोलिसांकडे होती.त्याच्या गुन्हेगारी कृत्यांमुळे सार्वजनिक सुव्यवस्था धोक्यात आली असून सामान्य नागरिकांचे दैनंदिन जीवनही प्रभावित होत असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले होते.

एमपीडीए अंतर्गत प्रस्तावाला मंजुरी

पेठ बीड पोलीस ठाण्याचे तत्कालीन पोलीस निरीक्षक यांनी ५ मार्च २०२६ रोजी आरोपीविरुद्ध

पान १ वरून...

एमपीडीए कायद्यांतर्गत स्थानबद्धतेचा प्रस्ताव सादर केला होता. या प्रस्तावाची सखोल पडताळणी केल्यानंतर जिल्हादंडाधिकारी विवेक जॉन्सन यांनी २२ मे २०२६ रोजी आरोपीला स्थानबद्ध करण्याचा आदेश जारी केला.त्यानुसार आरोपीस तात्काळ ताब्यात घेऊन हर्सूल कारागृहात हलविण्याचे निर्देश देण्यात आले होते.

न्यायालयीन परवानगीनंतर कारवाई

सदर आरोपी न्यायालयीन कोठडीत असल्याने न्यायालयाची आवश्यक परवानगी घेण्यात आली. त्यानंतर दिनांक १३ जून २०२६ रोजी दुपारी १२.३२ वाजता आरोपीला कायदेशीररित्या ताब्यात घेऊन कडक पोलीस बंदोबस्तात हर्सूल केंद्रीय कारागृह, छत्रपती संभाजीनगर येथे रवाना करण्यात आले.

वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वी मोहीम..

ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, प्रभारी पोलीस अधीक्षक चेतना तिडके यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. यामध्ये स्थागुशा शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक अभिमन्यू औताडे, तत्कालीन पोलीस निरीक्षक मारुती खेडकर, प्रभारी पोलीस निरीक्षक निलेश केळे, पोलीस उपनिरीक्षक मन्सूर शहा, पोलीस हवालदार सुभाष मोठे, नितीन राठोड, नितेश माने तसेच इतर अधिकारी- कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

**ठाण्यात अवैध 'मिक्स....**

समोर छापा टाकला. कारवाईदरम्यान टँकरचे सील तोडून 'मिक्स हायड्रोकार्बन ऑईल'ची बेकायदेशीर साठवणूक व देवाणघेवाण सुरू असल्याचे उघडकीस आले. दोन व्यक्ती या प्रकारात प्रत्यक्ष सहभागी असल्याचे आढळून आले.ही कारवाई नियंत्रक शिधावाटप चंद्रकांत डांगे यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य दक्षता पथकाचे सहायक नियंत्रक शिधावाटप प्रदीप काळे, सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी योगेश जंगले, मुख्य निरीक्षण अधिकारी नागनाथ हंगरगे तसेच शिधावाटप निरीक्षक रामराजे भोसले, चंद्रकांत कांबळे, विकास नागदिवे, रवींद्र राठोड, राजेश सोरते, देवानंद थोरवे, पवन कुंभले, राहुल इंगळे आणि अरुण काते यांच्या संयुक्त पथकाने यशस्वीरित्या पार पाडली.

**शिवाजीनगर पोलिसांच्या...**

शेख, उपविभागीय पोलीस अधिकारी व्यंकटराम आणि शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली डीबी पथकाने ही यशस्वी कारवाई केली.

या मोहिमेत सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक संतोष राऊत, पोलीस कर्मचारी रवींद्र आघाव, ज्ञानेश्वर मराडे, सचिन आगलावे, अनंत गिरी, बाळू रहाडे, दिलीप राठोड, अशोक राडकर, शुभम सोनवणे आणि अनिल घटमळ यांनी उल्लेखनीय कामगिरी बजावली.

प्रवाशांसाठी पोलिसांचे महत्त्वाचे आवाहन..

बीड पोलिसांनी बसस्थानक परिसरातील प्रवाशांना अधिक सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

गर्दीत मोठ्या प्रमाणात रोकड किंवा मौल्यवान दागिने बाळगणे टाळावे.

बॅग आणि पर्स नेहमी स्वतःच्या ताब्यात ठेवावी.

गर्दीत धक्काबुक्की करणाऱ्या किंवा संशयास्पद हालचाली करणाऱ्या व्यक्तींवर लक्ष ठेवावे.

कोणतीही संशयास्पद बाब दिसल्यास तात्काळ पोलिसांशी संपर्क साधावा.




लिंगायत एंटरप्रेन्युअर असोसिएशनच्या वतीने नाशिकमध्ये

# नाशिक येथे लिंगायत समाजाचा भव्य उद्योजक मेळावा संपन्न

नाशिक प्रतिनिधी

लिंगायत समाजातील उद्योजक, व्यावसायिक आणि नवउद्योजकांना एकत्र आणण्याच्या उद्देशाने लिंगायत एंटरप्रेन्युअर असोसिएशन यांच्या वतीने रविवार, दि. १४ जून २०२६ रोजी नाशिक येथे भव्य उद्योजक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

हा मेळावा सकाळी ९ ते दुपारी २ या वेळेत क्वालिटी इन रीजन्सी, नाशिक-पुणे महामार्ग, विजय ममता (फेम थिएटर) जवळ, नाशिक येथे पार पडला. या कार्यक्रमासाठी महाराष्ट्रातून विविध भागातून छत्रपती संभाजीनगर, सोलापूर,कोल्हापूर,नांदेड नाशिक जिल्ह्यातून कार्यक्रमासाठी विविध क्षेत्रातील उद्योजकांना परस्पर परिचय, व्यवसायवृद्धीच्या संधी, नेटवर्किंग तसेच नवीन व्यावसायिक संकल्पनांची देवाणघेवाण करण्यासाठी उपस्थित होते.

हा उपक्रम केवळ व्यवसाय, उद्योगवृद्धी आणि व्यावसायिक संबंध दृढ करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आला असून लिंगायत समाजातील उद्योजक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. सुमारे २०० पेक्षा अधिक उद्योजक व्यवसायिक या कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रमुख निमंत्रक उद्योजक शिप्रा इंजिनिअरिंग इंजिनिअरिंग एमडी मल्लिकार्जुन उंमदी, बिदर टेक्नोक्रॅट्स प्रायव्हेट लिमिटेड एमडी महादेव बेले,सुमनचंद्र ग्रुपचे सुनील भायबंग,सोमा वाईन यार्ड व्हिलेज एमडी प्रदीप पाच पाटील,इफिशन्ट इंजीनियरिंगचे नितीन हिंगमिरे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी लिंगायत एंटरप्रेन्युअर असोसिएशन फाउंडर मेंबर कोर टीम प्रसाद ताकटे,अजिंक्य हिंगमिरे,अतुल वाळेकर,अजिंक्य मोडसे, राहुल कबाडे,ओमकार पाचपाटील,यश हुकीरे,रुपेश शाहीर यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मागील दोन महिन्यापासून परिश्रम घेतले.

# शिक्षण वाढलं... पण माणुसपण कुठे हरवलं ?

## आजच्या सत्य परिस्थितीला शिकले तितके हुकले ही म्हण लागू होते काय ?

पिंपरी पुणे -

आजची परिस्थिती एका वृद्ध आईच्या डोळ्यांत अश्रू होते. मुलगा मोठ्या पदावर होता, भरपूर पगार कमावत होता, समाजात त्याला मान-सन्मान होता. पण त्या आईला हवं होतं ते ना मुलाचं पद, ना त्याचा पगार. तिला हवे होते फक्त दोन प्रेमाचे शब्द, थोडासा वेळ आणि मुलाच्या सहवासाची ऊब. त्या क्षणी मनात एक प्रश्न उमटला शिक्षणाने आपण खरोखर मोठे झालो आहोत का ?

आजचा काळ शिक्षणाचा, तंत्रज्ञानाचा आणि प्रगतीचा आहे. प्रत्येक पालक आपल्या मुलांनी शिकावं, मोठं व्हावं, चांगली नोकरी करावी, भरपूर पैसा कमवावा आणि समाजात नाव कमवावं अशी स्वप्नं पाहतो. ही स्वप्नं योग्यच आहेत. कारण शिक्षण माणसाला उभं राहायला शिकवतं, जगाशी दोन हात करायला शिकवतं. पण आज मनात एक प्रश्न सतत घोळत राहतो शिक्षण वाढलं, पण माणुसकीही तितकीच वाढली का ?

आज आपण अभिमानाने सांगतो, माझ्याकडे अमुक डिग्री आहे, मी उच्चशिक्षित आहे', 'माझा मुलगा मोठ्या पदावर आहे, माझी मुलगी परदेशात आहे, माझी सून खूप शिकलेली आहे.' हे ऐकताना आनंद वाटतो. पण कधी कधी असंही जाणवतं की शिक्षणाचा अभिमान नकळत अहंकारात बदलत चालला आहे.

मोठ्या पदव्या मिळाल्या, मोठे पगार मिळाले, प्रतिष्ठा मिळाली; पण या सगळ्याच्या धावपळीत आपण माणसं जोडणं विसरलो का ?

पूर्वीची माणसं फारशी शिकलेली नव्हती. त्यांच्या नावामागे मोठ्या पदव्या नव्हत्या. पण त्यांच्या मनात माणुसकी होती. भेटलं की माणूस मनभर बोलायचा. सुख-दुःख वाटून घ्यायचं. शेजाऱ्याच्या घरात अडचण आली तर स्वतःचं काम बाजूला ठेवून मदतीला धावायचं.

आज घरं मोठी झाली, पण मनं लहान झाली का ?

पूर्वी एका घरात दहा माणसं राहायची, आणि ती मनाने एकत्र असायची. आज चार माणसं एका घरात राहतात, पण प्रत्येक जण आपल्या मोबाईलच्या पडद्यामागे हरवलेला दिसतो. संवाद कमी झाला, आपुलकी कमी झाली आणि नाती केवळ औपचारिक राहिली.

सगळ्यात जास्त वेदना तेव्हा होतात, जेव्हा वृद्ध आई-वडील आपल्या मुलांच्या दोन प्रेमळ शब्दांसाठी वाट पाहत बसतात. ज्यांनी स्वतःच्या इच्छा, स्वप्नं आणि आयुष्य मुलासाठी खर्च केलं, त्यांच्यासाठी आज मुलांकडे वेळ नाही. पैसा कमावणं गरजेचं आहे, करिअर महत्त्वाचं आहे, पण आई-वडिलांच्या डोळ्यातील अपेक्षा त्याहून मोठी नाही का ?

आपल्या संस्कृतीने आपल्याला शिकवलं आहे 'मातृ देवो भव, पितृ देवो भव. सकाळी उठल्यावर आई-वडिलांना नमस्कार करणं, त्यांची विचारपूस करणं, त्यांच्या अनुभवांचा आदर करणं ही केवळ



परंपरा नाही; ती आपली संस्कृती आहे, आपली ओळख आहे.

खरं शिक्षण म्हणजे फक्त पुस्तकातील ज्ञान नाही. खरं शिक्षण म्हणजे नम्रता. खरं शिक्षण म्हणजे दुसऱ्याचा आदर. खरं शिक्षण म्हणजे आई-वडिलांबद्दल कृतज्ञता. खरं शिक्षण म्हणजे नात्यांना जपण्याची कला.

जर शिक्षणामुळे माणसाच्या बोलण्यातला गोडवा हरवत असेल, जर पदवीमुळे नम्रता कमी होत असेल, जर मोठ्या पगारामुळे माणुसकी मागे पडत असेल, तर आपण स्वतःलाच विचारायला हवं आपण खरंच सुशिक्षित झालो आहोत का ?

कारण पदवी माणसाला विद्वान बनवते, पण संस्कार त्याला महान बनवतात. पैसा सुखसोयी देऊ शकतो, पण प्रेम देऊ शकत नाही. मोठं पद मान मिळवून देऊ शकतं, पण माणुसकी नाही.

आज समाजाला गरज आहे ती केवळ उच्चशिक्षित लोकांची नाही, तर सुसंस्कृत, संवेदनशील आणि माणुसकी जपणाऱ्या माणसांची आहे. अशा माणसांची, ज्यांच्या यशात नम्रता असेल, ज्यांच्या प्रगतीत संस्कार असतील आणि ज्यांच्या शिक्षणात माणुसकी असेल.

चला, पुन्हा एकदा नात्यांना वेळ देऊया. आई-वडिलांना नमस्कार करूया. मोठ्यांचा आदर करूया. मोबाईलपेक्षा माणसांना महत्त्व देऊया. कारण शेवटी आपल्या पदव्या, पैसा आणि प्रतिष्ठा नाही, तर आपली माणुसकीच लोकांच्या स्मरणात राहणार आहे.

कारण शेवटी माणसाच्या अंत्ययात्रेत त्याच्या पदव्या, पगार किंवा पद सोबत जात नाही; सोबत जातात ती त्याने कमावलेली माणसं, दिलेलं प्रेम आणि जपलेली माणुसकी.

आणि म्हणूनच आज मनातून एकच प्रश्न उमटतो

शिक्षण वाढलं, पैसा वाढला, तंत्रज्ञान वाढलं... पण माणुसपण कुठे हरवलं ?

लेखिका :

प्रा. दिपाली नारायण बागनाईक,प्राध्यापिका,

डॉ. डी. वाय. पाटील आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालय, पिंपरी, पुणे १८



# श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थान येथील अधिकमास निमित्त अखंड हरिनाम सप्ताहाची भक्तिमय सांगता

## महंत बबन बहिरवाळ महाराजांच्या 'काल्याच्या कीर्तनाने' भाविक मंत्रमुग्ध

लिंबागणेश प्रतिनिधी

बीड तालुक्यातील बेलगाव येथील श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थानमध्ये अधिकमासानिमित्त दि. ७ जूनपासून मठाधिपती महंत शांतीब्रम्ह तुकाराम महाराज भारती यांच्या मार्गदर्शनात सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताह व श्री संत तुकाराम महाराज गाथा पारायण सोहळ्याची आज दि.१४ रविवार रोजी श्री ह.भ.प. बबन महाराज बहिरवाळ (श्री संत मदन महाराज संस्थान, कडा) यांच्या सुश्राव्य काल्याच्या कीर्तनाने भक्तिमय वातावरणात सांगता झाली.

गुरुवर्य महंत मठाधिपती महादेव भारती महाराज व मठाधिपती शांतीब्रह्म तुकाराम भारती महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली हा सप्ताह उत्साहात पार पडला. सांगता प्रसंगी बबन महाराज बहिरवाळ यांच्या अमृततुल्य काल्याच्या कीर्तनाने उपस्थित भाविक मंत्रमुग्ध झाले.

यावेळी ह.भ.प. अर्जन महाराज येडे, ह.भ.प. रंजीत महाराज, ह.भ.प. बबन महाराज वायकर, ह.भ.प. तुकाराम महाराज भोसले, ह.भ.प. बाबासाहेब महाराज शिंदे, किशोर महाराज येडे, माऊली महाराज शेळके, ह.भ.प. बाबा देशमुख महाराज, अशोक येडे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

काल्याच्या कीर्तनातून बबन महाराज यांनी भगवान श्रीकृष्ण यांच्या बाललीलांपासून ते अवतार समाप्तीपर्यंतच्या जीवनप्रवासाचे रसाळ निरूपण केले. हे विश्वच माझे घर या तत्त्वज्ञानाचा संदेश देत नामस्मरण, समभाव आणि विश्वबंधुत्व हीच खरी भक्ती असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले.

सप्ताहादरम्यान विविध नामवंत कीर्तनकारांनी समाजप्रबोधनपर कीर्तनसेवा दिली. दि. ७ जून रोजी ह.भ.प. रंजित महाराज शिंदे (निनगुर), दि. ८ रोजी ह.भ.प. बाबासाहेब महाराज शिंदे (वैद्यकिन्ही), दि. ९ रोजी ह.भ.प. कृष्णा महाराज उबाळे (च-हाटा), दि. १० रोजी ह.भ.प. दत्ता महाराज वायभट (पिंपरनई), दि. ११ रोजी ह.भ.प. त्र्यंबक महाराज मातकर (वरवटी), दि. १२ रोजी ह.भ.प. सुरेश महाराज जाधव (न्यूज १८ मराठी, बीड जिल्हा प्रतिनिधी) तसेच दि. १३ रोजी ह.भ.प. बबन महाराज मंझरीकर यांनी कीर्तन सेवा दिली.

पंचक्रोशीतील विविध गावांतील मृदंगाचार्य, वारकरी व भजनी मंडळांच्या सहभागातून हरिजागर, प्रवचन, भजन, हरिपाठ, पारायण, गाथा व काकडा यांसह विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. महाशिवरात्र उत्सव समिती बेलगाव, बेलगाव तरुण मंडळ आणि विश्वस्त मंडळ यांच्या वतीने कार्यक्रमाचे नियोजनबद्ध आयोजन करण्यात आले.

पुरणपोळीच्या महाप्रसादाचा लाभ

काल्याच्या कीर्तनानंतर पंचक्रोशीतील भाविकांनी घरून वाजतगाजत आणलेल्या पुरणपोळ्या, गुळवणी, आमटी, कुरडई व भजी यांच्या महाप्रसादाचा भाविकांनी मोठ्या श्रद्धेने आस्वाद घेतला.या संपूर्ण सप्ताहात पंचक्रोशीतील भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली.

## पंढरपूर येथील रोहित पवार यांच्या अन्नत्याग आंदोलनाला आम आदमी पार्टीचा पाठिंबा - माजी सैनिक अशोक येडे

पंढरपूर /प्रतिनिधी

शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांसाठी पंढरपूर येथे सुरू असलेल्या आमदार यांच्या अन्नत्याग आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी आम आदमी पार्टी, बीड जिल्ह्याच्या वतीने माजी सैनिक अशोक येडे (जिल्हाध्यक्ष) यांनी भेट दिली.




यावेळी अशोक येडे यांनी बीड जिल्ह्यात आम आदमी पार्टीने शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी राबविलेल्या विविध आंदोलनांची माहिती दिली. यामध्ये केळ वाटो आंदोलन, गाजर आंदोलन, आसूड आंदोलन तसेच शेतकरी हिताच्या विविध प्रश्नांवर पक्षाने केलेल्या संघर्षाची सविस्तर चर्चा केली.रोहित पवार हे शेतकऱ्यांची कर्जमाफी, शेतीमालाला हमीभाव, शेती संदर्भातील विविध प्रलंबित प्रश्न आणि शेतकऱ्यांच्या न्याय्य मागण्यांसाठी आंदोलन करत आहेत. त्यांच्या या लढ्याला पाठिंबा व्यक्त करण्यासाठी आम आदमी पार्टीच्या शिष्टमंडळाने भेट देऊन आंदोलनाला नैतिक समर्थन दिले.यावेळी सय्यद सादिक (शहराध्यक्ष, आम आदमी पार्टी बीड), राजेंद्रजी आमटे (शेतकरी हक्क मोर्चा), आकाश आमटे यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

शेतकऱ्यांच्या हक्कासाठी जे कोणी संघर्ष करत आहेत, त्यांच्या पाठीशी आम आदमी पार्टी सदैव ठामपणे उभी राहील असे मत जिल्हाध्यक्ष अशोक येडे यांनी यावेळी व्यक्त केले.

## अनाधिकृत शाळांमध्ये पाल्यांचा प्रवेश घेऊ नये

### गटशिक्षणाधिकारी सय्यद हकीम

माजलगाव /प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील सर्व पालकांनी आपल्या पाल्यांचा प्रवेश केवळ शासनमान्य व अधिकृत शाळांमध्येच घ्यावा, असे आवाहन गटशिक्षणाधिकारी सय्यद हकीम यांनी केले आहे.

काही शाळांकडून शासनाची मान्यता नसताना किंवा मंजूर क्षमतेपेक्षा अधिक वर्ग सुरू करून प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे. अशा शाळांमध्ये पालकांनी आपल्या पाल्यांचा प्रवेश घेऊ नये. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताच्या दृष्टीने केवळ शासनमान्य शाळांचीच निवड करावी.ज्या शाळांना शासनाने ज्या वर्गांपर्यंत मान्यता दिलेली आहे, त्या शाळांना केवळ त्याच वर्गांमध्ये प्रवेश घेण्याची व अध्यापन करण्याची परवानगी आहे. मंजुरी नसताना अतिरिक्त वर्ग सुरू करणे अथवा विद्यार्थ्यांचे प्रवेश घेणे हा नियमांचा भंग असून अशा प्रकारांना कोणतीही परवानगी नाही.

तसेच, मान्यतेच्या अटींचे उल्लंघन करणाऱ्या किंवा मंजूर वर्गांपेक्षा अधिक वर्ग चालविणाऱ्या शाळांवर संबंधित नियमांनुसार कठोर प्रशासकीय कारवाई करण्यात येणार



असल्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

तसेच अनधिकृत शाळांची माहिती जमा करण्याचे काम आरटीई विभाग प्रमुख लक्ष्मण पोटभरे हे करत आहेत त्यांना त्या पद्धतीच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत संबंधित शाळेची माहिती जमा झाल्यानंतर ती यादी प्रसिद्ध करण्यात येईल .पालकांनी प्रवेश घेण्यापूर्वी संबंधित शाळेची मान्यता, मंजूर वर्ग व इतर आवश्यक बाबींची खात्री करूनच आपल्या पाल्यांचा प्रवेश निश्चित करावा, असे आवाहन गटशिक्षणाधिकारी सय्यद हकीम यांनी केले आहे.

# परळीतुन अपहरण झालेल्या व्यक्तीची स्थानिक गुन्हे शाखेने सुटका करुन चार आरोपीस ठोकल्या बेड्या

बीड /प्रतिनिधी

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने मिळालेल्या गुप्त माहितीनुसार आरोपीची शोध मोहीम सुरू करताच आरोपीने गुन्ह्यातील पिडीत व्यक्ती तुकाराम पंढरीनाथ मुंडे यांना अमरावती जिल्ह्यातील हिंगणघाट येथे डोळ्यावर पट्टी बांधुन सोडुन दिले. त्याठिकाणी पिडीत व्यक्तीस ताब्यात घेवुन त्यांच्याकडुन घटनेची अधिक माहिती घेवुन, पाच कोटी रूपयाच्या खंडणीसाठी आरोपी नामे सचिन नारायण वंजारे,संतोष नारायण वंजारे दोघे रा. परळी,अल्केश विष्णुजी अवजाडे, शुभम राजु पिपंळकर दोघे रा. मंगरूळ चावला ता.जि. अमरावती यांनी अपहरण केल्याचे उघड झाले. यापैकी आरोपी नामे संतोष नारायण वंजारे रा. परळी ता. परळी जि. बीड यास गुन्ह्याचे तपास कामी अटक करून त्यांने गुन्ह्याबाबत पुर्ण माहिती सांगुन गुन्हा केल्याची कबुली दिल्याने त्यास ताब्यात घेवुन पुढील तपास कामी पोस्टे परळी ग्रामिण यांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

पोलीस ठाणे परळी ग्रामिण हद्दीमध्ये दि.४ जून २०२६ रोजी १.३० वा ते २.०० वाजे दरम्यान परळी औष्णीक विद्युत केंद्र परिसरामधुन इसम नामे तुकाराम पंढरीनाथ मुंडे वय ५४ वर्षे रा. संगम ता. परळी वै.जि. बीड हमु थर्मल कॉलनी परळी ता.परळी जि.बीड याची अज्ञात आरोपीने अज्ञात कारणासाठी अपहरण केल्याची घटना घडली होती. सदर घटनेवरून पोलीस ठाणे परळी ग्रामिण येथे गुरन.२६६/२०२६ कलम १३७(२) भारतीय न्याय संहिता



प्रमाणे गुन्हा दाखल झाला होता.

सदर गुन्ह्याच्या तपासा दरम्यान स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांनी तात्काळ स्थानिक गुन्हे शाखेतील पोउपनि सुशांत सुतळे, यांच्या मार्गदर्शनाखाली पोह/मारूती कांबळे, पोह/सचिन सानप, पोह/रामचंद्र केकान, पोह/गोविंद भताने, व पोअ/सचिन आंधळे यांचे विशेष तपास पथक तयार करून, त्याना योग्य त्या सुचना देवुन सदर पथकाने तात्काळ घटनास्थळावर जावुन घटनेची संपुर्ण माहिती घेवुन घटनेच्या परिसरातील उउढत फुटेज चेक करून त्यामधुन मारूती सुझुकी कंपनीची गाडी निष्पन्न केली. निष्पन्न झालेल्या गाडीचा उउढत फुटेजद्वारे अमरावती पर्यत माग काढुन, अमरावती येथे गेल्यानंतर त्याठिकाणी गुन्ह्यातील पिडीत व आरोपीची पुर्ण माहिती घेवुन, पिडीत व्यक्तीचा व आरोपीचा पाठलाग करून दोघांना ताब्यात घेतले. तर उर्वरीत आरोपी हे बाहेर राज्यात गेल्याची माहिती मिळाल्याने त्यांचा नागपुर, मध्यप्रदेश, राज्यस्थान व दिल्ली येथे शोध घेतला. आरोपी नामे सचिन नारायण वंजारे,अल्केश विष्णुजी अवजाडे, शुभम राजु पिपंळकर दोघे रा. मंगरूळ चावला ता.जि. अमरावती यांना पोस्टे परळी ग्रामिण यांनी अटक केलेली आहे. गुन्ह्यातील सर्व आरोपी अटक करून गुन्ह्याचा पुढील तपास पोस्टे परळी ग्रामिण पोलीस करीत आहेत.

सदरची कामगिरी मा.प्र.पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके मॅडम, मा. सहा. पोलीस अधीक्षक ऋषीकेश शिंदे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि शिवाजी बंटेवाड, स्थागुशा, पोनि मझरअली सय्यद पोस्टे परळी ग्रामिण, पोउपनि सुशांत सुतळे, पोह/मारूती कांबळे, पोह/सचिन सानप, पोह/रामचंद्र केकान, पोह/गोविंद भताने, व पोअ/सचिन आंधळे, पोअ/विकी सुरवसे, पोअ/आसेफ शेख सर्व स्थागुशा यांनी मिळून केली आहे.

## राज्याच्या विकासात बँकेचे योगदान महत्त्वपूर्ण - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई /प्रतिनिधी

स्टँडर्ड चार्टर्ड बँकेने गेल्या सात वर्षांत महाराष्ट्रात जलसुरक्षा, आरोग्यसेवा, रोजगारनिर्मिती आणि हवामान बदलाला तोंड देण्याच्या क्षमतेच्या विकासासाठी राबविलेल्या विविध सामाजिक उपक्रमांचा राज्यातील ८.३ लाखांहून अधिक नागरिकांना थेट लाभ झाला आहे. या उपक्रमांमुळे राज्याच्या विकासात मोलाचे योगदान दिले आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

# आ. रोहीत दादा पवार यांच्या आंदोलनास पाठिंबा देण्यासाठी बीड मध्ये आज धरणे आंदोलन

बीड /प्रतिनिधी

शेतकऱ्यांच्या न्याय हक्कासाठी आमदार रोहित दादा पवार यांनी पंढरपूर येथे अन्नत्याग आंदोलन सुरू केले आहे.शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्का साठी सुरू असलेल्या या संघर्षाला पाठिंबा देण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) बीड जिल्ह्याच्या वतीने आज सोमवार, दि. १५ जून २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे धरणे आंदोलनाचे आयोजन करण्यात आले आहे.

राज्य सरकारने जाहीर केलेल्या कर्जमाफी योजनेतील जाचक अटी तात्काळ रद्द करून सर्व पात्र शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी देण्यात यावी, या मागणी साठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) चे युवा नेते तथा आ. रोहितदादा पवार यांनी १२ जूनपासून पंढरपूर येथे अन्नदात्यासाठी अन्नत्याग आंदोलन सुरू केले आहे.परंतु अद्याप राज्य सरकारने सकारात्मक प्रतिसाद देऊन कोणताही ठोस निर्णय घेतलेला नाही अन्यथा ही कर्जमाफी योजना नसून कर्ज वसुली योजना ठरेल. आ. रोहितदादा पवार यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी सुरू केलेल्या अन्नत्याग आंदोलनाला बळ देण्यासाठी तसेच शासनाचे लक्ष वेधण्यासाठी बीड येथे धरणे आंदोलन आयोजित केले आहे.

शेतकऱ्यांच्या हितासाठी या धरणे आंदोलनात पक्षाचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते, शेतकरी हितचिंतक व संघटना, आणि शेतकरी बांधवांनी बहुसंख्येने या आंदोलनात सहभागी व्हावे असे आवाहन जिल्हाध्यक्ष यांनी केले आहे.

## एमपीएससीची परीक्षा सुरळीतरित्या पार पडली

कोल्हापूर (जिमाका)

महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई यांच्या मार्फत महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षा - २०२६ ही परीक्षा रविवार १४ जून रोजी सकाळी ११ते १२ या वेळेत कोल्हापूर जिल्ह्यात सुरळीतरित्या पार पडली.

जिल्ह्यातील कोपार्डे, सांगरूळ, कुडीत्रे, कागल, इचलकरंजी, वाठार, वडगांव, अतिग्रे आदी ठिकाणासह कोल्हापूर शहरातील महाविद्यालये व हायस्कूल अशा ६२ उपकेंद्रावर ही लेखी परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेकरीता जिल्ह्यात एकूण १८९८५ परिक्षार्थी बसले होते यापैकी १५७३५ विद्यार्थी उपस्थित तर ३२५० विद्यार्थी अनुपस्थित होते.

## गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार शेतकऱ्यांसाठी वरदान -मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड

मुंबई /प्रतिनिधी

पर्यावरण वाचवणे आणि भूजल पातळी टिकवण्यासाठी पावसाचे पाणी अडवून जमिनीत मुरवणे हीच आजच्या काळातील सर्वात मोठी गरज आहे. पावसाचे वाहून जाणारे पाणी अडवून भूगर्भात मुरवणे आणि वाहून जाणारी माती थांबवणे ही गरज ओळखून 'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार' या मोहिमेत प्रत्येक नागरिकाने राज्य शासनासोबत एकत्र येऊन काम करणे गरजेचे आहे, असे आवाहन मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी केले.

# संत ईश्वर भारती महाराज यांच्या समाधीच्या सेवेने देवप्राप्ती होते- श्री ह भ प सुरेश महाराज जाधव

लिंबागणेश - संत ईश्वर भारती महाराज यांच्या समाधीच्या सेवेने देवप्राप्ती होते. संतांच्या दरबारात सेवा करण्याचे भाग्य पूर्व पुण्याईने मिळते. अधिकमासात संतांच्या दरबारात केलेली सेवा दुप्पट फळ देते.असे प्रतिपादन श्री ह भ प सुरेश महाराज जाधव यांनी केले. अधिक मासानिमित्त श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थान येथे सुरू असलेल्या भव्य अखंड हरिनाम सप्ताहात सहाव्या दिवसाचे किर्तन पुष्पगुंपताना ते बोलत होते.यावेळी प्रमुख उपस्थिती श्री ह भ प महंत महादेव महाराज भारती श्री ह भ प महंत तुकाराम महाराज भारती, सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे,श्री ह भ प बबन महाराज मंजरीकर, श्री ह भ प तुपे महाराज, बबन महाराज, यांच्यासह हजारो भावीक भक्तांची उपस्थिती होती.

बीडच्या श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थान येथे अधिकमासाच्या पावनपर्वावर भव्य अखंड हरिनाम सप्ताह सुरू आहे.या सप्ताहात सहाव्या दिवसाचे कीर्तन पुष्प श्री ह भ प सुरेश महाराज जाधव यांनी गुंफले यावेळी संतश्रेष्ठ जगद्गुरु तुकाराम महाराज यांच्या..

भावे गावे गीत ।शुद्ध करूनियां चित्त ।। १ ।।
तुज व्हावा आहे देव । तरी हा सुलभ उपाव ।। २ ।।
आणिकांचे कानी ।गुण दोष मना नाणी ।। ३ ।।
मस्तक ठेंगणा ।करी संतांच्या चरणा ।। ४ ।।
वेंची ते वचन ।जेणे राहे समाधान ।। ५ ।।
तुका म्हणे फार ।थोडा तरी परउपकार ।। ६ ।।

या अभंगावर सुंदर चिंतन मांडले. मानवी



जीवन जगत असताना माणसाच्या जीवनामध्ये लग्न आयुष्यात आल्यानंतर एकदाच कराव . कुंभ स्नान तीन वर्षातून एकदा करावं. देव आणि संतांची वारी वर्षातून एकदा करावी. व्यायाम, अभ्यास,दान आणि संघष्ठन माणसाने दररोज करावे.असे महाराजांनी सांगितले. संतांची सेवा आणि संतांचा सत्संग दररोज मिळवण्यासाठी प्रयत्न करावा. संतांच्या संगती मध्ये गेल्यानंतर जीवनाचे सोने आणि कल्याण होते. सत्संगती मध्ये गेल्यानंतर देवप्राप्तीचा साधनेचे वर्म कळते. एवढेच नाही तर संत हे प्रत्येक पावला पावलाचे मार्गदर्शन जीवाला करतात.

भजन करायचं असेल तर ते कसं केलं पाहिजे.. हे या अभंगातून सांगतात.शुद्धभावयुक्त अंतकरणाने केलेले भजन हे देवप्राप्तीचे सोपे साधन आहे.ते करावे असेही महाराजांनी सांगितले. दुसऱ्यांच्या गुणदोषाचे चिंतन न करणे, संतांच्या चरणाजवळ शुद्ध अंतकरणाने नतमस्तक होऊन सेवा करणे, देवप्राप्तीचे सोपे साधन आहेत तर बोलत असताना पुढील व्यक्तीचे अंतकरणात समाधान निर्माण होईल असं बोललं पाहिजे. बरेच असेल त्या ठिकाणी थोडा का होईना परोपकारकर्ता आला पाहिजे. एवढं केलं तरी देवप्राप्ती होऊ शकते. असं महाराजांनी सांगितलं.

यावेळी वेगवेगळी उदाहरणे देत,व्यसनमुक्तीचा संदेश, स्त्री सक्षमीकरण, अभ्यासाचे महत्त्व, मुलांना संस्कार द्या, आई-वडिलांची सेवा करा. प्रत्येक मुलांनी आई-वडिलांचं ऐकलं पाहिजे गुरुजनांच्या संदर्भात आदरयुक्त भीती असली पाहिजे. जेवण करत असताना अन्नपदार्थाचा नास होऊ देऊ नका.अशा विविध सामाजिक विषयाचे प्रबोधन केले. महाराजांनी विनोदी शैली मधून लोकांना सामाजिक प्रबोधन केल्याने कीर्तनात श्रोते मंत्रमुग्ध झाले होते.

यावेळी कीर्तनात साथ संगत. भजन सम्राट शहादेव महाराज येडे, संगीत अलंकार किशोर महाराज येडे, माऊली महाराज खोटे, मृदंग साथ अशोक महाराज येडे, बजरंग महाराज पावणे, व बेलेश्वर संस्थांवरील शेकडो टाळकरी मंडळी विणेकरी,चोपदार, तुळशीवाली माता भगिनी उपस्थित होते.

### आरकेएसव्हीएम सीबीएसई शाळेची अधिक मास निमित्त

# श्रीराम जन्मभूमी अयोध्या धाम व श्रीक्षेत्र काशीविश्वनाथ अध्यात्मिक सहल संपन्न

धर्माबाद / अशोक पडोळे

राजस्थानातील डीडवाना येथे स्थित ७०० वर्षांची गौरवशाली परंपरा लाभलेल्या झालरिया पीठाचे पीठाधीश परमपूज्य श्री. श्री. श्री. १००८ घनश्यामाचार्यजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली पुरुषोत्तम मासानिमित्त देशातील विविध तीर्थक्षेत्रांमध्ये धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. तिरुपती बालाजी, बद्रीनाथ, पंढरपूर, चित्रकूट, पुष्कर तसेच श्रीराम जन्मभूमी अयोध्या धाम येथे श्रीमद्भागवत कथा, विविध यज्ञ, सत्संग आणि सामूहिक सेवाकार्यांच्या माध्यमातून अखिल भारतीय माहेश्वरी समाजाला एकत्र आणण्याचे पवित्र कार्य सुरू आहे.

या भव्य उत्सवामध्ये ॲलेन परिवार आणि आरकेएसव्हीएम सीबीएसई शाळा परिवारानेही उत्साहाने सहभाग नोंदवून आपल्या सेवाभावाचा ठसा उमटविला.

गुरुजींच्या आशीर्वादाने समाजामध्ये विचारांची देवाणघेवाण,



सामाजिक एकात्मता आणि संस्कारमूल्यांची जोपासना करण्यासाठी सातत्याने कार्यरत असलेला ॲलेन परिवार पुन्हा एकदा चर्चेचा विषय ठरला आहे.पुरुषोत्तम मासानिमित्त श्रीक्षेत्र अयोध्या धाम येथे दररोज सुमारे १० हजारांहून अधिक भाविक कथा व यज्ञ सेवेमध्ये सहभागी होत आहेत. या भाविकांसाठी चहा, पाणी, नाश्ता, दोन वेळचे मिष्टान्न भोजन, यज्ञभूमी स्वच्छता, शोभायात्रा व्यवस्थापन आदी विविध सेवांमध्ये ठघडतच् परिवारातील सदस्यांनी उल्लेखनीय योगदान दिले. या सेवाकार्यामुळे उपस्थित भाविकांमध्ये शाळेचा नावलौकिक अधिक वृद्धिंगत झाला.

दि. २७ मे ते ३ जून २०२६ या कालावधीत आरकेएसव्हीएम सीबीएसई परिवारातील सदस्यांनी केलेले सेवाकार्य सर्वांसाठी प्रेरणादायी, अनुकरणीय व दिशादर्शक ठरले. या संपूर्ण उपक्रमात शाळेचे व्यवस्थापकीय संचालक आदरणीय सुबोधजी काका यांचे सूक्ष्म मार्गदर्शन आणि प्रेरणा विशेष महत्त्वाची ठरली.

या यशस्वी आयोजनासाठी अखिल भारतीय माहेश्वरी समाजाचे मोलाचे सहकार्य लाभले. तसेच पुरुषोत्तम मासानिमित्त आरकेएसव्हीएम सीबीएसई शाळेच्या शिक्षकांची श्रीक्षेत्र अयोध्या आणि श्रीक्षेत्र काशी देवस्थान दर्शन यात्रा अत्यंत यशस्वीरीत्या संपन्न झाली.

शिक्षकांना अंतरराज्यीय स्तरावरील महान तीर्थक्षेत्रांचे दर्शन घडवून त्यांच्या सांस्कृतिक व आध्यात्मिक जडणघडणीस चालना देण्याचे कार्य शाळेने केले असून, महाराष्ट्रातील शैक्षणिक क्षेत्रासाठी हे एक आदर्श उदाहरण ठरत असल्याची चर्चा सर्वत्र होत आहे.

कला, शिक्षण आणि संस्कार यांच्या त्रिवेणी संगमातून घडणारे व्यक्तिमत्त्व म्हणजेच ठघडतच. धार्मिक संस्कार, सामाजिक बांधिलकी आणि राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देणाऱ्या या उपक्रमामुळे आरकेएसव्हीएम सीबीएसई शाळेच्या कार्याचा गौरव सर्व स्तरांतून व्यक्त केला जात आहे.

# जिल्हा प्रमुख महादेव मातकर यांचा रक्तदाता दिनानिमित्त यथोचित गौरव

## शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाकडून रक्तदान चळवळीला मिळाली नवसंजीवनी : डॉ. सोळुंके

बीड /प्रतिनिधी

चला रक्ताचे नाते जोडूया, हा संदेश देत रक्तदान चळवळीला नवसंजीवनी देणारे शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे बीड जिल्हा प्रमुख महादेव मातकर यांचा आज ( १४ जून) रोजी जागतिक रक्तदाता निमित्त जिल्हा रुग्णालयात प्रशस्तिपत्र प्रदान करून यथोचित सन्मान केला.

बीड जिल्हा आणि मराठवाड्यात शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे जिल्हा प्रमुख महादेव मातकर यांनी अल्पावधीत आरोग्य सेवेत मोठे योगदान दिले आहे. राज्याचे संवेदनशील उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब, संसदरत्न खासदार डॉ. श्रीकांतजी शिंदे, आरोग्यमंत्री प्रकाशजी आबिटकर यांच्या आदेशान्वये आणि उपमुख्यमंत्री कार्यालयाचे ओएसडी मंगेश चिवटे,

युवासेना मराठवाडा संपर्क प्रमुख बाजीराव चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य सेवेचा यज्ञ अविरतपणे सुरु आहे. आज शेकडो रुग्णांचे प्राण वाचले असून हजारो रुग्णांना मदत झाली आहे. जिल्हा प्रमुख महादेव मातकर यांच्या पुढाकाराने गेल्या वर्षभरात विविध



रक्तदान शिबिरे आयोजित करून बीड जिल्हा रुग्णालयास जवळपास १०० रक्त पिशव्या देण्यात आल्या.

या कार्याची दखल घेत जागतिक रक्तदाता दिनानिमित्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सतीशकुमार सोळुंके, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. नागेश चव्हाण यांच्या हस्ते त्यांना प्रशस्तिपत्र प्रदान करण्यात आले.

रुग्णालयातील कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सोळुंके म्हणाले, रक्तदान चळवळ व्यापक होण्यासाठी प्रामाणिक प्रयत्नांची गरज आहे. रक्तदान हे केवळ दान नसून एखाद्याला नवजीवन देण्याचे महान कार्य आहे. आपल्या रक्ताच्या एका दानामुळे कोणाच्यातरी आयुष्यात आशेचा किरण निर्माण होऊ शकतो.

रक्तदान चळवळीला बळ द्या : मातकर

आपण समाजाचे देणेकरी लागतो, याच भावनेतून प्रत्येकाने काम करण्याची गरज आहे. युवकांनी रक्तदान शिबिरे आयोजित करून रक्त संकलनच्या पिशव्या शासकीय रुग्णालयालाच दिल्या पाहिजेत, असे आवाहन सन्मानमूर्ती महादेव मातकर यांनी केले.



## राजसाहेब ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त

# अनाथ व बेघरांना अन्नदान

वयोवृद्धांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवत राजसाहेबांचा वाढदिवस साजरा- वर्षाताई जगदाळे

बीड /प्रतिनिधी

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राजसाहेब ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त समाजाभिमुख उपक्रम राबवत बीड येथील जिव्हाळा अनाथ व बेघर निवारा केंद्रामध्ये अन्नदान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या राज्य उपाध्यक्ष वर्षाताई जगदाळे यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमामुळे निवारा केंद्रातील वयोवृद्ध, निराधार आणि बेघर नागरिकांच्या चेहऱ्यावर आनंदाचे हास्य फुलले.

समाजातील वंचित, गरजू आणि निराधार घटकांप्रती संवेदनशीलता जपत राजसाहेब ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त हा उपक्रम राबविण्यात आला. अन्नदानाच्या माध्यमातून केवळ पोटाची भूक भागली नाही, तर आपुलकी, प्रेम आणि माणुसकीचा स्पर्शही या वृद्धांना अनुभवायला मिळाला. अनेक मायमाऊलींनी भावुक होत राजसाहेब ठाकरे यांच्या उत्तम आरोग्यासाठी आणि दीर्घायुष्यासाठी मनःपूर्वक प्रार्थना करत भरभरून आशीर्वाद दिले.

या प्रसंगी सिटीजनचे उपसंपादक देवेंद्र ढाका, दैनिक बीड प्रसारचे संपादक काझी समीरोद्दीन, फास्ट अपडेटचे पत्रकार नवीद इनामदार, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या महिला जिल्हाध्यक्ष आशाताई कुटे, महिला उपजिल्हाध्यक्ष कल्पना कवठेकर, तसेच जिव्हाळा बेघर निवारा केंद्राचे व्यवस्थापक राजू वंजारे, अभिजीत वैद्य आणि छायाताई सरोदे आदी मान्यवर उपस्थित होते.

# पसायदान नाव असलेल्या पोदार स्कुलच्या नाठाळांच्या माथी शिक्षण विभाग मारणार का काठी?

माजलगाव /प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील सावरगाव येथील परिसरात नुकत्याच सुरू झालेल्या पसायदान पोदार स्कूल संदर्भात विविध प्रश्न उपस्थित होत असून शाळेच्या नाव,पत्ता आणि कार्यक्षेत्राबाबत पालकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.

शाळेच्या जाहिराती,बॅनर आणि प्रसिद्धी साहित्यामध्ये शाळेचा संबंध एमआयडीसी समोर माजलगावशी दर्शविला जात असला तरी प्रत्यक्षात शाळेचे ठिकाण सावरगाव परिसरात आहे. त्यामुळे नेमके शाळेचे अधिकृत ठिकाण कोणते, याबाबत पालकांकडून प्रश्न उपस्थित केले जात आहेत.स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, शाळेच्या प्रचारासाठी डिजिटल बॅनर, सोशल मीडियावरील जाहिराती आणि विविध माध्यमांचा वापर करण्यात येत आहे.या जाहिरातींमध्ये माजलगावचे नाव ठळकपणे वापरले जात असल्याने अनेक पालकांना शाळा माजलगाव शहरात सुरू होत असल्याचा समज झाला. मात्र प्रवेश प्रक्रिये दरम्यान किंवा प्रत्यक्ष भेट दिल्यानंतर शाळेचे ठिकाण सावरगाव शिवारात असल्याचे समोर येत असल्याचा दावा काही पालकांनी केला आहे.

शिक्षण क्षेत्रात पारदर्शकता आणि विश्वासार्हता अत्यंत महत्त्वाची मानली जाते




शाळेचे नाव,पत्ता, मान्यता, यू-डाइज क्रमांक आणि इतर प्रशासकीय माहिती स्पष्टपणे उपलब्ध असणे आवश्यक असते. अशा परिस्थितीत शाळेच्या स्थानाबाबत जर संभ्रम निर्माण होत असेल, तर त्याचा परिणाम पालक आणि विद्यार्थ्यांच्या निर्णय प्रक्रियेवर होऊ शकतो असे शिक्षण क्षेत्रातील जाणकारांचे मत आहे.काही पालकांनी असा प्रश्न उपस्थित केला आहे की, जर शाळा सावरगाव येथे कार्यरत असेल तर जाहिरातींमध्ये माजलगावचे नाव प्रामुख्याने का वापरले जात आहे? यामागे प्रवेशसंख्या वाढविण्याचा उद्देश आहे का,याचीही चर्चा होत आहे,मात्र यासंदर्भात संस्थाचालकांची अधिकृत भूमिका समोर आलेली नाही.

**मान्यता नसताना प्रवेश सुरू असतील तर कारवाई होणार- रणदिवे, गटशिक्षणाधिकारी बीड**

नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होताच विविध शाळांकडून प्रवेश प्रक्रिया राबविली जात आहे आकर्षक जाहिराती, आधुनिक सुविधा आणि विविध आश्वासने देत पालकांना प्रवेशासाठी प्रोत्साहित केले जात आहे. मात्र अशा वेळी पालकांनी कोणत्याही शाळेत आपल्या पाल्याचा प्रवेश घेण्यापूर्वी संबंधित शाळेची मान्यता, यु-डायस कोड आणि इतर आवश्यक शासकीय कागदपत्रांची खात्री करणे अत्यंत आवश्यक आहे.

ज्ञानेश्वर महाराज यांनी विश्व कल्याणासाठी लिहिलेल्या पसायदान चा गैर वापर करून शाळेचे नाव पसायदान ठेवलेल्या संस्था चालका सह संबंधितां विरोधात संत तुकाराम महाराजांच्या नाठाळांच्या माथी,मारा काठी या उपदेशा नुसार शिक्षण विभागाने शाळांच्या मान्यता,नोंदणी आणि प्रशासकीय बाबींची नियमित पडताळणी करणे आवश्यक असल्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. पालकांना प्रवेश घेण्यापूर्वी संबंधित शाळेची अधिकृत कागदपत्रे,मान्यता, यू-डाइज क्रमांक तसेच शाळेचा अधिकृत पत्ता तपासून घेण्याचे आवाहनही शिक्षण क्षेत्रातील मान्यवरांनी केले आहे.

माजलगाव आणि सावरगाव परिसरातील नागरिकांचे म्हणणे आहे की, शिक्षण ही सेवा असून त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा संभ्रम निर्माण होऊ नये. विद्यार्थ्यांच्या भविष्याशी संबंधित असलेल्या संस्थांनी सर्व माहिती पारदर्शकपणे जाहीर करणे ही त्यांची नैतिक जबाबदारी आहे. त्यामुळे या प्रकरणाची संबंधित शिक्षण विभागाने दखल घेऊन वस्तुस्थिती स्पष्ट करावी अशी मागणी होत आहे.

या संदर्भात शाळा व्यवस्थापनाची बाजू जाणून घेण्यासाठी संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्यांचे स्पष्टीकरण प्राप्त झाल्यास तेही प्रसिद्ध करण्यात येईल. सध्या मात्र शाळेचे वास्तविक ठिकाण, अधिकृत मान्यता आणि जाहिरातींमध्ये करण्यात आलेल्या दाव्यांबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून पालक वस्तुस्थिती समोर येण्याची वाट पाहत आहेत.



# मांजरा धरणाला जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांची भेट

## मनपाच्या नवीन जॅकवेल कामाची पाहणी

लातूर /प्रतिनिधी

लातूर शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या धनेगाव येथील मांजरा धरणाला जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी आज भेट दिली. यावेळी त्यांनी धरणातील उपलब्ध पाणीसाठ्याचा आढावा घेतला असून, राज्य शासनाच्या आदेशानुसार धरणातील सर्व पाणी केवळ पिण्यासाठी राखीव ठेवण्याच्या सक्त सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

'एल निनो'च्या संभाव्य प्रभावाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्व प्रकल्पांमधील पाणी पिण्यासाठी राखीव ठेवण्याचे निर्देश राज्य शासनाने निर्गमित केले आहेत. या अनुषंगाने पाटबंधारे विभागाने तातडीने कार्यवाही करावी, असे जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड म्हणाले. तसेच, धरणातून अवैध पाणी उपसा करणाऱ्यांवर नियमानुसार तात्काळ कठोर कारवाई करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

या पाहणी दौऱ्यावेळी जलसंपदा विभागाच्या अधीक्षक अभियंता रुपाली ठोंबरे, कार्यकारी अभियंता अमरसिंह पाटील आणि लातूर शहर महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव यांच्यासह संबंधित विभागांचे इतर अधिकारी उपस्थित होते.

## पोलीस स्टेशन केज यांची कामगीरी

# रात्रीचे वेळी रोड रॉबरी करणाऱ्या गुन्हेगारांचा पाठलाग करुन केज पोलिसांनी २ आरोपी केले जेरबंद

बीड /प्रतिनिधी

प्रभारी पोलीस अधीक्षक बीड, श्रीमती चेतना तिडके मॅडम, सहा. पोलीस अधीक्षक वेकंटराम साहेब यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक व त्यांचे दुय्यम अधिकारी अंमलदार यांनी दिनांक १४ जून २०२६ रोजी केज अंबाजोगाई रस्त्यावर जबरी चोरी करणाऱ्या दोन आरोपींचा पाठलाग करून अटक करण्याची धाडसी कामगिरी केली आहे.

प्राप्त माहितीनुसार, दिनांक १३/०६/२०२६ रोजी २३.०० वाजण्याचे सुमारास धनराज नामदेव सुर्यवंशी, वय ३० वर्ष, रा. पिसेगाव ता. केज जि. बीड यांनी फोन करुन सांगीतले की, आम्ही पती पत्नी असे त्यांची मोटारसायकल पासींग क्रमांक एमएच ४४ ए २४३० यावर बसुन पिसेगाव फाट्यापासून वळुन गावाकडे जात असतांना पिसेगाव फाट्यापासून काही अंतरावर त्यांना एक मोटार सायकलवरील चार लोकांनी त्यांचे कडील मोटारसायकल आडवी लावून त्यांना चाकूचा धाक दाखवून धमकावून पैसे आणि सोन्याचे दागीने हीसकावून घेतले. तेंव्हा प्रियका धनराज सुर्यवंशी व धनराज सुर्यवंशी यांनी जोरजोराने आरडा ओरड केल्याने यातील



चोर हे त्यांची जवळील एक मोटार सायकल सोडुन जंगलात पळुन गेले अशी माहिती मिळाल्याने पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे, पोलीस उपनिरीक्षक लक्ष्मण कीर्तने, सहा. फौजदार फुलचंद सानप, पोलीस नाईक पुरुषोत्तम शेप, पोलीस अंमलदार गोविंद मुंडे, सहा. फौजदार शंभुदेव दराडे, तसेच डीबी पथकातील पोह नागरगोजे, पोअं देवगुडे असे तात्काळ घटनास्थळी गेले असता चोरांकडील मोटार सायकल क्रमांक चक ४५ ट ८१८३ ही जागेवरच मिळून आली. फिर्यादी धनराज नामदेव सुर्यवंशी, वय-३० वर्ष, रा. पिसेगाव ता. केज जि.बीड यांनी नमुद चोराचे वर्णन सांगीतल्याप्रमाणे सीसीटीव्ही बघुन चोराची खात्री करुन त्यांचा शोध घेत असतांना नमुद प्रकरणातील चोर हे केज शहरातून मोटार सायकलवर बसुन कळंब रोडने जात असतांना त्यांना पोउपनि लक्ष्मण किर्तने व पोह अनिल नागरगोजे यांनी थांबण्याचा ईशारा केला ते भरधाव वेगात मोटार चालवत होते तेंव्हा त्यांचा पोउपनि लक्ष्मण किर्तने व पोह/२०२४ अनिल नागरगोजे यांनी पाठलाग केला. नमुद आरोपी यांनी हॉटेल संतोष पॅलेस समोर मोटारसायकल पासींग क्रमांक एमएच ४४ ई ३५७६ ही सोडुन पळून जात असतांना त्यांचा पाठलाग करुन त्यापैकी दोन आरोपी यांना पकडले. त्यांना त्यांचे नाव गाव विचारले असता त्यांनी १. शेषेराव हिम्मत शिंदे, वय-५० वर्ष, रा. मोहा ता. कळंब जि. धाराशिव, २. भिमा आबा काळे, वय १९ वर्ष, रा. दत्तनगर ढोकी ता.जि. धाराशिव असे असल्याचे सांगीतले त्यामधील शेषेराव हिम्मत शिंदे, वय-५० वर्ष, रा. मोहा ता. कळंब जि. धाराशिव याची झडती घेतली असता त्याचे अंगझडतीमध्ये गुन्हयातील चोरलेली रोख रक्कम मिळून आली. तरी फिर्यादी नामे धनराज नामदेव सूर्यवंशी, वय ३० वर्ष, व्यवसाय-मजुरी, रा. पिसेगाव ता. केज जि.बीड यांचे फिर्यादीवरुन पोलीस ठाणे केज गु.र.नं. ३७१/२०२६ कलम ३०९(४), ३०९(६) भारतीय न्यायसंहिता अन्वये गुन्हा दाखल असुन मा. पोलीस निरीक्षक साहेब यांचे आदेशाने सदरचे गुन्हयाचा तपास हा सफौ फुलचंद सानप हे करीत आहे.सदरची कामगीरी प्रभारी पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके मॅडम, सहा. पोलीस अधिक्षक वेंकटराम साहेब यांचे मार्ग दर्शनाखाली पोलीस स्टेशन केज चे पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे, पोउपनि लक्ष्मण किर्तने, सहा, फौजदार फुलचंद सानप, पोलीस नाईक पुरुषोत्तम शेप, पोलीस अंमलदार गोविंद मुंडे, सहा. फौजदार शंभुदेव दराडे, तसेच डीबी पथकातील पोह नागरगोजे, पो देवगुडे यांनी केलेली आहे.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# आष्टी तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या शाळा आजपासून सुरु होणार

## पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांचे उत्साहात होणार स्वागत

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) शालेय शिक्षण विभागाच्या निर्देशानुसार आणि महाराष्ट्र शासनाच्या शाळा प्रवेशोत्सव उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी बीड जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने जिल्ह्यातील १०० शाळांना भेटी देण्याचा विशेष उपक्रम राबविण्याचा निर्णय घेतला आहे. यासंदर्भात जिल्हाधिकारी मा. विवेक जॉन्सन (भा.प्र.से.) यांच्या स्वाक्षरीने सर्व संबंधित अधिकारी व शिक्षण विभागाला मार्गदर्शक सूचना जारी करण्यात आल्या आहेत.

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ ची सुरुवात आज सोमवार, दि. १५ जून २०२६ रोजी होत असून या दिवशी जिल्हा परिषद, महसूल विभाग तसेच इतर विविध विभागांतील अधिकारी, लोकप्रतिनिधी आणि शिक्षण क्षेत्रातील पदाधिकारी यांनी शाळांना भेट देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत करावे, असे निर्देश देण्यात आले आहेत. शासनाच्या विविध निर्णयांचा संदर्भ देत हा उपक्रम तालुक्यात प्रभावीपणे राबविण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अशी माहिती आष्टी पंचायत समितीचे कर्तव्यदक्ष गटशिक्षणाधिकारी रवींद्र महामुनी यांनी दिली आहे.

जिल्हा परिषद शाळांमधील पटसंख्या वाढविणे, गुणवत्तापूर्ण शिक्षणाची माहिती पालकांपर्यंत पोहोचविणे आणि विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत वाढ करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. यासाठी शिक्षकांनी आपल्या शाळा परिसरातील अंगणवाडी, बालवाडी तसेच पालकांशी संपर्क साधून इयत्ता पहिलीत दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांची यादी तयार करावी आणि त्यांना शाळेत प्रवेशासाठी प्रोत्साहित करावे, असे निर्देश देण्यात आले आहेत.

तसेच शाळांमधील उपलब्ध सुविधा, शिष्यवृत्ती योजना, विविध शैक्षणिक उपक्रम आणि विद्यार्थ्यांच्या प्रगतीची माहिती समाजमाध्यमे व प्रसिद्धी माध्यमांतून व्यापकपणे प्रसारित करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. शाळा प्रवेशोत्सवात गावचे सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी, पंचायत समिती सदस्य, जिल्हा परिषद सदस्य,



आमदार, खासदार तसेच विविध लोकप्रतिनिधींना निमंत्रित करून त्यांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांचे स्वागत करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. शाळांना भेट देणाऱ्या अधिकाऱ्यांनी स्थानिक नागरिक, पालक, शाळा व्यवस्थापन समिती आणि ग्रामपंचायत प्रतिनिधींशी संवाद साधून शाळेच्या विकासासाठी आवश्यक बाबींची माहिती घ्यावी, असेही सांगण्यात आले आहे.

शाळा सुरू होण्यापूर्वी सर्व मुख्याध्यापक, शिक्षक व केंद्रप्रमुख यांनी शाळा परिसर, वर्गखोल्या, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, स्वच्छतागृहे आणि इतर भौतिक सुविधांची तपासणी करून आवश्यक सुधारणा कराव्यात, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे. शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करणे, पालकांना विशेष निमंत्रण देणे, अंगणवाडी सेविका व मदतनीसांना सहभागी करून घेणे, विद्यार्थ्यांची प्रभातफेरी काढणे, पहिले पाऊल उपक्रमांतर्गत इयत्ता पहिलीत दाखल झालेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत करणे, सर्व विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके व गणवेशांचे वाटप करणे, शाळेचा पहिला दिवस उत्सवाप्रमाणे साजरा करून तिथी भोजनाचे आयोजन करणे, अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

शाळांना भेट देणाऱ्या अधिकाऱ्यांनी शिक्षणाची गुणवत्ता, निपुण महाराष्ट्र अभियानाची अंमलबजावणी, विद्यार्थ्यांच्या अध्ययनाची स्थिती, शालेय स्वच्छता, क्रीडा साहित्य, पोषण शक्ती निर्माण योजना, विविध स्पर्धा परीक्षा आणि शाळांमधील भौतिक सुविधांचा आढावा घ्यावा, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

याशिवाय शाळांमधील आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी संबंधितांना मार्गदर्शन करणे आणि शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी उपाययोजना सुचविणे अपेक्षित आहे. १०० शाळांना भेटी या उपक्रमांतर्गत दिलेल्या भेटींचा सविस्तर अहवाल तयार करून संबंधित गटशिक्षणाधिकाऱ्यांनी एकत्रित स्वरूपात जिल्हा कार्यालयात सादर करावा, असे निर्देश देण्यात आले आहेत. जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांचे अहवालही यासोबत जोडण्यास सांगण्यात आले आहे. शाळेची वेळ सकाळी १० ते सायंकाळी ४.३० अशी निश्चित करण्यात आली असून संपूर्ण जिल्ह्यात शाळा प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात आणि लोकसहभागातून साजरा करण्यासाठी प्रशासनाने व्यापक तयारी सुरू केली आहे.



महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळ व वाहतूक पोलीसांच्या वतीने

# नो पार्किंग झोन मध्ये उभ्या असलेल्या वाहनांवर दंडात्मक कारवाइ

गेवराई प्रतिनिधी -:

एसटी बसस्थानकांच्या २०० मीटर परिसरात खासगी व अवैध प्रवासी वाहनांना रोखण्यासाठी परिवहन विभागाने ५ जून ते १५ जून दरम्यान राज्यव्यापी धडक कारवाई मोहीम हाती घेतली आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाच्या निर्देशानुसार व परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या सूचनेनुसार हे पाऊल उचलण्यात आले आहे.

नो पार्किंग ची अंमलबजावणी बसस्थानकांच्या २०० मीटर मधील परिसर हा खासगी वाहनांसाठी निषिद्ध क्षेत्र म्हणजेच नो पार्किंग झोन घोषित करण्यात आला आहे.अवैध वाहतूक रोखण्यासाठी एसटी महामंडळाचे अधिकारी, आगार व्यवस्थापक आणि स्थानिक पोलिसांच्या संयुक्त पथकांची स्थापना करण्यात आली आहे.नियमांचे उल्लंघन करणाऱ्या खासगी वाहनांवर राज्य परिवहन मंडळाचे कर्मचारी व स्थानिक वाहतूक पोलिसांच्या मदतीने दंडात्मक व कायदेशीर कारवाई केली जात आहे.याच अनुषंगाने गेवराई बस स्थानक परिसरातील २०० मीटरच्या आत मध्ये लावण्यात आलेल्या खाजगी वाहनांवर ही कारवाई करण्यात आली.यावेळी एस. एस. मसकरे सुरक्षा निरीक्षक,आर,एस, सूर्यवंशीसहाय्यक वाहतूक निरीक्षक गायकवाड. सा.वाहतूक निरीक्षक श्री राजाभाऊ तांदळे, पोलीस हेड कॉन्स्टेबल वाहतूक शाखा बीड यांच्या संयुक्त विद्यमानाने या खाजगी वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आलेली आहे.



# कुंभारी गावाचा सुपुत्र बनला अग्निवीर, गावात जल्लोषात सत्कार!

**सार्थक कैलास साळवे याची भारतीय सैन्यात ग्रामपंचायतीतर्फे शाल-श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन गौरव**

भोकरदन इसरारखान पठाण

कुंभारी, ता. भोकरदन स्वप्न उराशी बाळगणाऱ्या कुंभारीच्या सार्थक कैलास साळवे याने ते स्वप्न सत्यात उतरवले. अग्निवीर योजनेंतर्गत भारतीय सैन्य दलात त्याची निवड झाल्याने संपूर्ण कुंभारी गावात आनंदाचे वातावरण आहे. यानिमित्त आज ग्रामसंसद कार्यालय कुंभारी येथे त्याचा जाहीर सत्कार समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला.

गावचे सरपंच कृष्णा मुरकुटे यांच्या हस्ते सार्थक चा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. गळ्यात पुष्पहार, हातात पुष्पगुच्छ आणि कपाळावर विजय टिळा लावून उभ्या असलेल्या पार्थच्या चेहऱ्यावर देशसेवेचा अभिमान स्पष्ट दिसत होता. ग्रामस्थांनी त्याच्यावर फुलांचा वर्षाव करत शुभेच्छा दिल्या.

यावेळी सरपंच कृष्णा मुरकुटे म्हणाले, कठोर मेहनत व जिद्दीच्या जोरावर अग्निवीर म्हणून निवड मिळवून कुंभारी गावाची शान वाढवली आहे. आजचा तरुण भरकटत असताना सार्थक सारखी मुले देशसेवेसाठी पुढे येतात हे आम्हा सर्वांसाठी अभिमानास्पद आहे. तो गावातील इतर तरुणांसाठी प्रेरणादायी ठरेल

या सत्कार सोहळ्यास ग्रामसेवक मच्छिंद्र साबळे, तलाठी अविनाश चव्हाण, मा. सरपंच सूर्यकांत पाटील, उपसरपंच गौतम साळवे, मा. उपसरपंच रवींद्र साळवे, उपसरपंच प्रदीप शिंदे, ग्रामपंचायत सदस्य रावसाहेब दाभाडे, शालिकराम सहाने, विठ्ठल म्हस्के, प्रभू सहाने, मुक्तार मिर्झा, राहुल साळवे पिराजी फुके, गणेश फुकट असद मिर्झा, राजू मिर्झा, पंडित साळवे यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य, प्रतिष्ठित नागरिक, महिला व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पार्थच्या कुटुंबियांच्या डोळ्यात आनंदाश्रू होते.

कुटुंबाचा आधार, गावाचा अभिमान

अग्निवीर सार्थक कैलास साळवे हा कुंभारीतील सामान्य शेतकरी कुटुंबातील आहे. लहानपणापासूनच सैन्यात जाऊन देशसेवा करण्याचे स्वप्न त्याने पाहिले होते. आज ते पूर्ण झाल्याने कुटुंबियांसह संपूर्ण गावाचा ऊर अभिमानाने भरून आला आहे.

# एनईपी कार्यभार निश्चितीमुळे सीएचबी प्राध्यापकांवर रोजगाराचे संकट

## संघर्ष समितीची सहसंचालकांकडे न्यायासाठी धाव

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (एनईपी २०२०) अंतर्गत महाविद्यालयांच्या कार्यभार निश्चिती प्रक्रियेमध्ये अनेक विषयांचा पुरेसा विचार न करता मनमानी पद्धतीने कार्यभार निश्चित करण्यात आल्याचा गंभीर आरोप नेट-सेट, पीएच.डी. धारक संघर्ष समिती, महाराष्ट्र राज्यच्या वतीने करण्यात आला आहे. या प्रक्रियेमुळे राज्यातील अनेक महाविद्यालयांतील अनुदानित पदांची संख्या कमी झाली असून त्याचा थेट परिणाम तासिका तत्त्वावरील (सीएचबी) प्राध्यापकांच्या रोजगारावर होत असल्याने उच्च शिक्षण क्षेत्रात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

या पार्श्वभूमीवर संघर्ष समितीच्या पदाधिकाऱ्यांनी छत्रपती संभाजीनगर येथील उच्च शिक्षण विभागाच्या सहसंचालिका डॉ. प्राजक्ता वाघमारे यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. यावेळी कार्यभार निश्चिती प्रक्रियेतील त्रुटी, विविध विषयांना मिळालेला अपुरा प्रतिनिधित्वाचा दर्जा आणि त्यामुळे निर्माण झालेली रोजगाराची असुरक्षितता याकडे त्यांनी सहसंचालिकांचे लक्ष वेधले.

संघर्ष समितीच्या वतीने सादर करण्यात आलेल्या निवेदनात कार्यभार निश्चिती प्रक्रियेचे पुनर्मूल्यांकन करण्याची मागणी करण्यात आली. सर्व विषयांचा योग्य आणि न्याय्य समावेश करून अनुदानित पदांची कपात टाळावी तसेच तासिका तत्त्वावरील प्राध्यापकांना न्याय मिळावा, अशी ठाम भूमिका समितीने मांडली. राज्यातील हजारो नेट-सेट, पीएच.डी. पात्रताधारक प्राध्यापकांचे भवितव्य या निर्णयाशी निगडित असल्याने शासनाने तातडीने हस्तक्षेप करावा, अशी मागणीही करण्यात आली.

यावेळी संघर्ष समितीचे राज्य समन्वयक डॉ. सुरेश देवढे-पाटील यांनी एनईपीच्या अंमलबजावणीतील काही बाबींवर तीव्र नाराजी व्यक्त केली. ते म्हणाले की, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीतून जर विद्यार्थ्यांच्या पिढ्या घडविणाऱ्या शिक्षकांचाच पहिला बळी जाणार असेल, तर त्याचे परिणाम दूरगामी आणि गंभीर असतील. शिक्षकांच्या रोजगारावर गदा आणणारे कोणतेही धोरण स्वीकारार्ह नसून उच्च शिक्षण व्यवस्थेला कमकुवत करणाऱ्या अशा निर्णयांविरोधात संघर्ष समिती सातत्याने आवाज उठवत राहील.

बैठकीत डॉ. प्रमोद तांबे, डॉ. अमोल म्हस्के, डॉ. संतोष जाधव, डॉ. रमेश वाघमारे, डॉ. स्वप्नील बोधने, डॉ. भारत राठोड, डॉ. विकास गवई तसेच प्रा. अजय बनसोडे यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते. उपस्थितांनी कार्यभार निश्चिती प्रक्रियेतील विसंगतींची उदाहरणांसह माहिती देत अनेक महाविद्यालयांमध्ये अध्यापनाची आवश्यकता असतानाही पदसंख्या कमी होत असल्याची बाब निदर्शनास आणून दिली.



संघर्ष समितीच्या प्रतिनिधींनी स्पष्ट केले की, गेल्या अनेक वर्षांपासून सीएचबी प्राध्यापक अत्यल्प मानधनावर विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची जबाबदारी सांभाळत आहेत. उच्च शिक्षण संस्थांची गुणवत्ता टिकवून ठेवण्यात त्यांचे योगदान मोठे असूनही त्यांना कायमस्वरूपी संधी मिळालेली नाही. अशा परिस्थितीत नव्या कार्यभार निश्चितीमुळे त्यांच्या अस्तित्वावरच प्रश्नचिन्ह निर्माण होत असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.दरम्यान, सहसंचालिका डॉ. प्राजक्ता वाघमारे यांनी संघर्ष समितीच्या मागण्या संयमाने ऐकून घेतल्या. शासनाच्या नियमांनुसार संबंधित विषयाचा सकारात्मक विचार करून आवश्यक ती कार्यवाही करण्याचे आश्वासन त्यांनी दिल्याची माहिती संघर्ष समितीच्या वतीने देण्यात आली.

राज्यातील हजारो तासिका तत्त्वावरील प्राध्यापकांचे रोजगार, कुटुंबांचे आर्थिक भवितव्य आणि उच्च शिक्षण व्यवस्थेची गुणवत्ता या प्रश्नाशी निगडित असल्याने शासनाने या विषयात तातडीने हस्तक्षेप करून न्याय्य तोडगा काढावा, अशी अपेक्षा संघर्ष समितीच्या वतीने व्यक्त करण्यात आली.

वर्षानुवर्षे तुटपुंज्या मानधनावर उच्च शिक्षणाची जबाबदारी सांभाळणाऱ्या सीएचबी प्राध्यापकांचे सातत्याने शोषण करण्यात आले आहे. आता त्यांनाच रोजगारापासून वंचित करण्याचा प्रयत्न होत असेल, तर अशा दुटप्पी व्यवस्थेविरोधात राज्यभर तीव्र जनआंदोलन उभे राहील, असा इशारा संघर्ष समितीचे पदाधिकारी डॉ. प्रमोद तांबे यांनी दिला.

# वाळू माफियाचा गेम ओव्हर गोंदी पोलिसांची सर्वात मोठी कारवाई सराईत तस्कर पंकज सोळंकेवर

# एमपीडीए अंतर्गत तडीपारीचा बडगा

**अवैध धंदे दहशत आणि सरकारी कामात अडथळा आणणाऱ्याला थेट छत्रपती संभाजीनगर कारागृहात धाडले**



अंबड विशेष प्रतिनिधी :-

अवैध वाळू उपसा लोकसेवकांवर हल्ले,धमक्या आणि परिसरात गुंडगिरीच्या जोरावर दहशत निर्माण करणाऱ्या वाळू माफियांना जालना पोलिसांनी अत्यंत कडक शब्दांत इशारा दिला आहे. परिसरात कमालीचा कुप्रसिद्ध ठरलेला सराईत वाळू तस्कर पंकज सखाराम सोळंके वय ३७ रा.गोंदी ता.अंबड याच्यावर गोंदी पोलीस आणि पोलीस अधीक्षकांच्या विशेष पथकाने संयुक्तपणे एम.पी.डी.ए. कायद्यांतर्गत स्थानबद्धतेची तडीपारीची कारवाई केली आहे.या धडक कारवाईमुळे संपूर्ण जिल्ह्यातील अवैध वाळू तस्करांचे धाबे दणाणले असून वाळू विश्वात मोठी खळबळ उडाली आहे.

गुन्हेगारीचा आलेख वाढला कायद्याला दिले होते आव्हान

गोंदी पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहणाऱ्या पंकज सोळंके याच्यावर वाळू चोरी सरकारी कर्मचाऱ्यांना धमकावणे, लोकसेवकांच्या कामात अडथळे निर्माण करणे, शिवीगाळ व जीवघेणी मारहाण करणे यांसारखे अनेक गंभीर गुन्हे दाखल आहेत. पोलिसांच्या वतीने त्याच्यावर यापूर्वी अनेक प्रतिबंधात्मक कारवाया करण्यात आल्या होत्या.मात्र ना कायद्याची भीती ना खाकीचा धाक अशा आविर्भावात तो सातत्याने गुन्हे करत राहिला. त्याच्या वाढत्या दहशतीमुळे गोंदी परिसरातील सर्वसामान्य नागरिकांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण होते. अखेर त्याच्या गुंडगिरीला कायमचा चाप लावण्यासाठी गोंदी पोलिसांनी त्याचा एमपीडीए अंतर्गत स्थानबद्धतेचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठवला होता.काय आहे एम.पी.डी.ए. कायदा महाराष्ट्र झोपडपट्टी गुंड दारू अंमली पदार्थ व धोकादायक व्यक्ती यांच्या बेकायदेशीर कृत्यांना प्रतिबंध करणारा कायदा एमपीडीए १९८१ या अंतर्गत सराईत गुन्हेगाराला थेट १ वर्षासाठी कारागृहात स्थानबद्ध केले जाते.

जिल्हाधिकाऱ्यांची मंजुरी आणि थेट जेल वारी

जालना जिल्हाधिकाऱ्यांनी या प्रस्तावाची गांभीर्याने दखल घेत सर्व पुराव्यांची छाननी करून पंकज सोळंके याच्या स्थानबद्धतेच्या आदेशावर शिक्कामोर्तब केले. आदेश मिळताच १३ जून २०२६ रोजी पोलीस अधीक्षक पथक आणि गोंदी पोलिसांनी संयुक्त जाळे विणून आरोपी पंकज सोळंके याला बेड्या ठोकल्या. जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार त्याची १ वर्षासाठी छत्रपती संभाजीनगर येथील मध्यवर्ती कारागृहात रवानगी करण्यात आली आहे.सदर धडाकेबाज कारवाई जालना जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी, उपविभागीय पोलीस अधिकारी सिद्धेश्वर धुमाळ यांच्या थेट मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

या कारवाईत खालील जांबाज पोलीस अधिकाऱ्यांनी व कर्मचाऱ्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली

गोंदी पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी सपोनि अमोल गरले, पोउपनि हरी जंगले,सहा.फौ. फुलचंद हजारे.

पोलीस अधीक्षक पथक सपोनि अविनाश गडाख,सहा.फौ. बरडे.पो.ह.कोकणे,पो.कॉ. जी.एम. हरबक,पो.कॉ.एन.टी. बकाल,पो.कॉ.व्ही.के.हळदे, एम.व्ही.बोराडे,पो.ह.बाविस्कर आणि पो.ह.संदीप मान्टे.

आता खैर नाही पोलिसांचा गुन्हेगारांना थेट इशारा

गोंदी पोलिसांच्या या सिंघम स्टाईल कारवाईमुळे कायदा हातात घेणाऱ्यांना आणि अवैध धंद्यांच्या जोरावर मिरवणाऱ्यांना स्पष्ट संदेश मिळाला आहे. गुन्हेगारी किंवा दहशत कराल तर थेट तुरुंगाची हवा खावी लागेल हा पोलिसांचा वाढता दबाव आता गुन्हेगारांवर स्पष्ट दिसत आहे. या कारवाईचे गोंदी आणि अंबड परिसरातील नागरिकांनी फटाके फोडून आणि मिठाई वाटून स्वागत केले असून कायदा व सुव्यवस्था राखणाऱ्या जालना पोलिसांवर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# बोगस आरटीई प्रवेश तात्काळ रद्द करा, अन्यथा आंदोलनाचा इशारा!

## गेवराई तालुक्यातील खाजगी शाळांमधील गंभीर गैरप्रकार चव्हाट्यावर!

गेवराईत आरटीई प्रवेशात धनदांडग्यांची लबाडी; गरजू विद्यार्थ्यांचा हक्क हिरावला!


गेवराई प्रतिनिधी :

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील आरटीई (ठढए) २५% राखीव जागांच्या मोफत प्रवेश प्रक्रियेत गेवराई तालुक्यातील काही नामांकित खाजगी शाळांमध्ये कोट्यवधी रुपयांचे आर्थिक गैरव्यवहार आणि नियमांचे सर्रास उल्लंघन करून बोगस प्रवेश लाटल्याचा खळबळजनक प्रकार समोर आला असून, याविरोधात आता थेट गटशिक्षणाधिकाऱ्यांकडे पुराव्यांसह आक्रमक तक्रार दाखल करण्यात आली आहे. आर्थिक व सामाजिकदृष्ट्या वंचित, गोरगरीब आणि गरजू घटकांसाठी शासनाने सुरू केलेल्या या अत्यंत महत्त्वाकांक्षी योजनेला काही धनदांडग्या पालकांनी आणि भ्रष्ट यंत्रणेने मिळून हरताळ फासला असून, केवळ स्वतःच्या पाल्याला मोठ्या इंग्रजी शाळेत मोफत प्रवेश मिळावा म्हणून वयाची मूळ नोंद लपवून बनावट जन्म दाखले (बाल्यपत्र) सादर करणे, तहसीलदार कार्यालयाची दिशाभूल करून लाखो रुपयांचे उत्पन्न असतानाही एक लाखाच्या आतील खोटे उत्पन्नाचे दाखले जोडणे, असे गंभीर प्रकार उघडकीस आले आहेत. इतकेच नव्हे तर, आरटीईच्या अंतराच्या कडक नियमाला बगल देण्यासाठी ऑनलाईन अर्ज भरताना प्रत्यक्ष राहण्याचे ठिकाण वेगळे असतानाही गुगल मॅपवर शाळेजवळचे चुकीचे किंवा खोटे लोकेशन निवडून ऑनलाईन प्रणालीशी अक्षम्य छेडछाड करण्यात आली आहे; तर दुसरीकडे आरटीईची सोडत ही पूर्णपणे पारदर्शक आणि रँडम पद्धतीने होणे अपेक्षित असताना, गेवराईतील एकाच विशिष्ट शाळेमध्ये एकाच गावातील तब्बल ७ ते ८ विद्यार्थ्यांची संशयास्पद निवड झाल्याने या संपूर्ण ऑनलाईन लॉटरी पद्धतीवरच आणि संगणकीय मॅनिप्युलेशनवर मोठा प्रश्नचिन्ह निर्माण झाला आहे. गरजू आणि हक्काच्या गरिबांच्या मुलांचा हक्क हिरावून घेणाऱ्या या बोगस आणि श्रीमंत पालकांच्या लबाडीची तात्काळ विशेष समितीमार्फत उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी, संशयास्पद विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन त्यांच्या रहिवासी पत्त्याची प्रत्यक्ष भौतिक पडताळणी करण्यात यावी, त्यांच्या बँक खात्यांची व जीवनशैलीची सखोल चौकशी करून त्यांचे वास्तविक उत्पन्न तपासण्यात यावे, तसेच शासकीय मूळ रेकॉर्डशी कागदपत्रांची पडताळणी करून सर्व अपात्र आणि बोगस विद्यार्थ्यांचे प्रवेश तात्काळ रद्द करून दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अन्यथा या तीव्र अन्यायाविरोधात पालकांच्या वतीने तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल, असा आक्रमक इशारा या तक्रारीद्वारे शिक्षण विभागाला देण्यात आला आहे.

# कर्तव्यनिष्ठ प्रशासकीय अधिकारी तथा समाजाभिमुख व्यक्तिमत्त्व विलासराव धोंडे यांचे निधन

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) आष्टी शहराच्या सामाजिक व प्रशासकीय क्षेत्रातील एक आदरणीय व्यक्तिमत्त्व, सेवानिवृत्त नायब तहसीलदार कै. विलासराव ऊर्फ बाबूराव पांडुरंग धोंडे यांचे सोमवारी अहिल्यानगर येथे त्यांच्या राहत्या घरी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. गेल्या काही दिवसांपासून ते हृदयविकाराच्या आजाराने त्रस्त होते. मृत्यूसमयी त्यांचे वय ७४ वर्षे होते. त्यांच्या निधनामुळे आष्टी परिसरात हळहळ व्यक्त होत असून एक कर्तव्यनिष्ठ, प्रामाणिक व लोकाभिमुख प्रशासकीय अधिकारी काळाच्या पडद्याआड गेल्याची भावना सर्वत्र व्यक्त होत आहे.

कै. विलासराव धोंडे यांनी आपल्या प्रदीर्घ शासकीय सेवाकाळात नायब तहसीलदार म्हणून जबाबदारीचे पद सांभाळले. प्रशासनातील शिस्त, जनतेशी असलेला जिव्हाळ्याचा संबंध, कामातील पारदर्शकता आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांप्रती असलेली संवेदनशीलता यामुळे त्यांनी अधिकारी म्हणून स्वतंत्र ओळख निर्माण केली होती. कोणतेही काम नियमांच्या चौकटीत राहून, परंतु जनहिताला प्राधान्य देत पूर्ण करण्याची त्यांची कार्यपद्धती सर्वांना भावणारी होती.



त्यांच्या सेवाकाळात महसूल विभागातील अनेक महत्त्वाच्या जबाबदाऱ्या त्यांनी यशस्वीपणे पार पाडल्या. शेतकरी, गोरगरीब नागरिक आणि विविध शासकीय योजनांचा लाभ घेणाऱ्या लोकांच्या अडचणी समजून घेऊन त्यांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी ते नेहमी तत्पर असत. त्यामुळे अधिकारी म्हणूनच नव्हे तर एक सज्जन, मदतीसाठी धावून जाणारे आणि सर्वांना आपलेसे वाटणारे व्यक्तिमत्त्व म्हणूनही त्यांची ओळख होती.

सेवानिवृत्तीनंतरही त्यांनी सामाजिक क्षेत्राशी असलेले नाते कायम ठेवले. आष्टीतील विविध सामाजिक, शैक्षणिक व सार्वजनिक उपक्रमांमध्ये त्यांचा सहभाग राहिला. शांत, संयमी, अभ्यासू आणि सुसंस्कृत स्वभावामुळे त्यांना समाजात विशेष मानाचे स्थान प्राप्त झाले होते. त्यांच्या सहवासातून अनेकांना प्रेरणा मिळाली.

कै. विलासराव धोंडे हे पुणे येथील प्रसिद्ध लेखक, सहज जलबोधकार आणि भूजलवैज्ञानिक उपेंद्र धोंडे यांचे वडील होत. आपल्या मुलांच्या शिक्षणासाठी व संस्कारांसाठी त्यांनी घेतलेले परिश्रम आणि दिलेले मूल्याधिष्ठित संस्कार त्यांच्या कुटुंबाच्या यशामागील भक्कम आधार ठरले. कुटुंबवत्सल, प्रेमळ आणि जबाबदार कर्ता पुरुष म्हणूनही त्यांचा उल्लेख केला जातो.

त्यांच्या पार्थिवावर मूळ गावी आष्टी येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी नातेवाईक, मित्रपरिवार, प्रशासकीय क्षेत्रातील सहकारी, विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या निधनाची वार्ता समजताच विविध स्तरांतून शोकसंदेश व्यक्त करण्यात आले.

त्यांच्या पश्चात पत्नी, तीन भाऊ, एक बहीण, दोन मुले, एक मुलगी, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या निधनाने धोंडे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून आष्टी तालुक्याने एक अनुभवी, प्रामाणिक आणि जनतेच्या मनात घर करणारे व्यक्तिमत्त्व गमावले आहे. कै. विलासराव ऊर्फ बाबूराव पांडुरंग धोंडे यांच्या कार्याची, त्यांच्या साधेपणाची, प्रामाणिकपणाची आणि समाजसेवेची आठवण भावी पिढ्यांना प्रेरणा देत राहील. त्यांच्या स्मृतीस भावपूर्ण श्रद्धांजली.

# आधी पैसे भरा, मगच पीक कर्ज नुतनीकरण बँक ऑफ महाराष्ट्रच्या अटीविरोधात शेतकरी संघटना आक्रमक

## काकासाहेब साबळे पाटलांचा इशारा अटी रद्द करा, नाहीतर रस्ता रोको-जेल भरो आंदोलन, इतर बँका सह्या घेऊन नुतनीकरण करतात, मग इेच् ला काय अडचण?

भोकरदन इसरारखान पठाण

पुर्वीप्रमाणे पैसे न भरता पीक कर्जाचे नुतनीकरण होत होते, पण यावर्षी बँक ऑफ महाराष्ट्रने पैसे भरण्याची अट घातल्याने हजारो शेतकऱ्यांचे नुतनीकरण थांबले आहे, असा आरोप करत शेतकरी संघटना भोकरदन आक्रमक झाली आहे. संघटनेचे तालुका अध्यक्ष काकासाहेब साबळे पाटील यांच्या नेतृत्वाखाली शाखा व्यवस्थापक, बँक ऑफ महाराष्ट्र, भोकरदन यांना निवेदन देऊन पैसे भरण्याची व सिबिलची अट रद्द करा अशी मागणी करण्यात आली.


निवेदनात म्हटले आहे की, यावर्षी अतिवृष्टी व शेतीमालाला भाव नसल्यामुळे शेतकऱ्याची आर्थिक परिस्थिती अत्यंत वाईट झाली आहे. नुतनीकरण करण्यासाठी सावकाराकडून पैसे घेतल्यास एक लाखाच्या मागे एक दिवसाचे एक हजार मागत आहे. त्यामुळे शेतकरी नुतनीकरणास तयार नाही. यामुळे बँक छझ- मध्ये जाईल व शेतकऱ्यांवर कर्जाचा डोंगर वाढेल.

काकासाहेब साबळे पाटील यांनी निवेदनात ठळक मुद्दा मांडला, जालना ग्रामीण बँक, सहकारी बँक, कऊअऊ बँक व इतर बँक बिना पैसे भरल्याचे शेतकऱ्यांचे सह्या घेऊन नुतनीकरण करीत आहे. त्यामुळे बँकेचे ५०% पेक्षा जास्त नुतनीकरण झाले. आपल्या बँकेने अटी लावल्यामुळे दोन टक्के सुद्धा नुतनीकरण झाले नाही. यामुळे शेतकऱ्यांचे ७% ऐवजी १२% व्याज लागेल व कोट्यावधीचे नुकसान होणार आहे.



जेल भरो आंदोलन करू

साहेबांनी या निवेदनाची दखल घेवून वरील अटी रद्द कराव्या, ही विनंती. नसता शेतकरी संघटने तर्फे रस्ता रोखो, जेल भरो आंदोलन करण्यात येईल. या आंदोलनात आर्थिक अथवा जिवीत हाणी झाल्यास याची सर्वस्व जबाबदारी बँकेची असा सज्जड इशारा साबळे पाटील यांनी दिला.निवेदनाच्या प्रती बँक ऑफ महाराष्ट्र विभागीय कार्यालय छ. संभाजीनगर व मुख्य कार्यालय शिवाजी नगर पुणे येथे पाठवण्यात आल्या आहेत.




# मृत्यूचा सापळा बनलेल्या आष्टी-सातोना रस्त्याप्रश्री जनता आक्रमक

## जाफराबाद पंचायत समिती हादरली मनरेगा विहीर घोटाळ्याला लोकायुक्तांचा मोठा दणका

भोकरदन/जाफराबाद इसरारखान पठाण :-

गरजू शेतकऱ्यांच्या हक्कावर डल्ला मारणाऱ्या जाफराबाद पंचायत समितीतील भ्रष्ट कारभाराचे वाभाडे आता थेट लोकायुक्त दरबारी निघाले आहेत! महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतील मनरेगा वैयक्तिक लाभाच्या विहिरी मंजूर करण्यासाठी गरीब शेतकऱ्यांकडून लाखो रुपयांची बेकायदेशीर उकळपट्टी केल्याचा खळबळजनक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी थेट लोकायुक्त कार्यालयाने अधिकृत चौकशीचे आदेश दिल्याने जाफराबाद पंचायत समितीच्या प्रशासकीय वर्तुळात प्रचंड भूकंप झाला असून भ्रष्ट अधिकाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. लाचखोरीचे'व्हिडिओ व्हायरल थेट लोकायुक्तांकडे तक्रार मिळालेल्या माहितीनुसार मनरेगा अंतर्गत विहिरी मंजूर करण्यासाठी लाभार्थी शेतकऱ्यांकडे पैशांची उघड मागणी करण्यात आली होती. विशेष म्हणजे या कथित लाचखोरीचे आणि आर्थिक गैरव्यवहाराचे धक्कादायक व्हिडिओ पुरावेच समोर आले असून ते सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाले आहेत.

या गंभीर प्रकाराची राष्ट्रवादी युवक काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष भोकरदन तालुकाध्यक्ष प्रा. डॉ.अंकुश भगवानराव जाधव यांनी अत्यंत आक्रमक दखल घेतली. त्यांनी १२ मार्च २०२६ रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, लोकायुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांकडे पुराव्यांसह लेखी तक्रार दाखल केली होती. या तक्रारीत जाफराबादचे गटविकास अधिकारी देविदास मगर आणि विस्तार अधिकारी चव्हाण यांच्यावर थेट भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप करण्यात आले आहेत.

लोकायुक्तांकडून गुन्हा नोंद कारवाईचा पहिला हातोडा

प्रा. डॉ. अंकुश जाधव यांच्या तक्रारीची मुंबई येथील लोकायुक्त व उपलोकायुक्त कार्यालयाने अत्यंत गांभीर्याने दखल घेतली आहे. ५ जून २०२६ रोजी लोकायुक्त कार्यालयाने पाठवलेल्या पत्रात या तक्रारीची उलोआ कॉम १५८९/२०२६ टे-१३ या क्रमांकाने अधिकृत नोंद करण्यात आल्याचे स्पष्ट केले आहे. महाराष्ट्र लोकायुक्त व उपलोकायुक्त अधिनियम १९७१ आणि नियम १९७४' अंतर्गत या प्रकरणाची हायव्होल्टेज छाननी व चौकशी सुरू करण्यात आली असून यामुळे दोषी अधिकाऱ्यांचे धाबे पुरते दणाणले आहेत.

परतूर पिराजी गायकवाड :-

आष्टी ते सातोना हा २५ किलोमीटरचा रस्ता सध्या प्रवासासाठी नसून मरणाला आमंत्रण देण्यासाठीच उरला आहे की काय अशी भीतीदायक परिस्थिती निर्माण झाली आहे. अवघ्या अर्ध्या तासाचे अंतर पार करताना वाहनधारकांचे कंबरडे मोडत असून, हा रस्ता पूर्णपणे मृत्यूचा सापळा बनला आहे. या मार्गावरील मोठ्या पुलाचे बजेट उचलून गुत्तेदाराने ठेकेदार चक्क महाराष्ट्र शासनाच्या तोंडाला काळे फासले आहे पहिल्याच पावसात पुलाची थातूरमातूर दुरुस्ती उघडी पडली असून पूल ढासळला आहे. आता जर आणखी एक मोठा पाऊस झाला तर हा पूल पूर्णपणे वाहून जाण्याची आणि मोठा अनर्थ घडण्याची भीती निर्माण झाली आहे.

या गंभीर परिस्थितीची आणि भ्रष्टाचाराची सविस्तर बातमी

गुत्तेदाराची मुजोरी कामाऐवजी फक्त फलकबाजी

आष्टी ते सातोना हा मार्ग या भागातील मुख्य बाजारपेठेला जोडणारा प्रमुख दुवा आहे. या रस्त्यासाठी आणि पुलासाठी लाखो रुपयांचा निधी मंजूर झाला होता. परंतु, संबंधित गुत्तेदाराने केवळ कागदोपत्री घोडे नाचवून सर्व बजेट उचलून घेतले आणि प्रशासनाची दिशाभूल केली. पुलाची अत्यंत निकृष्ट दर्जाची डागडुजी केल्यामुळे पहिल्याच पावसाने त्याची दाणादाण उडवली. पूल ढासळलेला असतानाही शासन

## गुत्तेदाराने शासनाच्या तोंडाला फासले काळे पहिल्याच पावसात पूल ढासळल्याने संताप आंदोलनाचा इशारा



किंवा प्रशासनाला याचे काहीही भान राहिलेले नाही. गुत्तेदाराने रस्त्यावर केवळ 'काम चालू आहे' चे फलक लावून स्वतःची जबाबदारी झटकली आहे, मात्र प्रत्यक्ष काम कधी सुरू होणार? हा मोठा प्रश्न आहे. रस्त्याच्या दुतर्फा प्रचंड प्रमाणात झीज जिरन झाली असून साइडपट्ट्या खचल्या आहेत.

विद्यार्थी, शेतकरी

हा रस्ता अत्यंत महत्त्वपूर्ण मानला जातो कारण:

शैक्षणिक केंद्र या मार्गावर शेलू येथे मोठ्या मिल, कंपन्या आणि नामांकित महाविद्यालये, शाळा आहेत. दररोज हजारो विद्यार्थी-विद्यार्थिनी याच रस्त्यावरून जीव मुठीत धरून ये-जा करतात. आर्थिक केंद्र: आष्टी हे या भागातील मोठे सर्कल (मंडळ) आहे आणि येथूनच अवघ्या २५ किलोमीटरवर माजलगाव शहर आहे. शेतकरी, व्यापारी आणि सामान्य जनतेसाठी हीच मुख्य बाजारपेठ आहे.अपघातांचे सत्र: अंतर्गत रस्त्यांची झालेली कमालीची दुरावस्था, खड्ड्यांचे साम्राज्य आणि त्यातच काही वाहनधारकांचे बेदरकारपणे वाहन चालवणे, यामुळे या मार्गावर रोज छोटे-मोठे गंभीर अपघात घडत आहेत. अनेक नागरिक यात कायमचे अपंग झाले असून काहींना जीव गमवावा लागला आहे.

आता थेट 'रास्ता रोको'! सामाजिक संघटना व गावकरी एकवटले

यापूर्वी स्थानिक नागरिकांनी रस्ता दुरुस्तीसाठी आणि रुंदीकरणासाठी प्रशासनाला वेळोवेळी निवेदने दिली, मागण्या केल्या. मात्र, कुंभकर्णी झोपेत असलेल्या प्रशासनाला जाग आलेली नाही. त्यामुळे आता पाणी डोक्यावरून गेले असून, सामाजिक संघटना आणि पंचक्रोशीतील गावकऱ्यांनी एकत्र येत तीव्र आंदोलनाचे हत्यार उपसले आहे.प्रशासनाने तात्काळ या रस्त्याचे रुंदीकरण आणि पुलाचे दर्जेदार काम सुरू करावे अन्यथा यावेळी आम्ही केवळ निवेदन देणार नाही तर आक्रमकपणे 'रास्ता रोको' आंदोलन करू आणि न्याय मिळाल्याशिवाय एक पाऊलही मागे हटणार नाही

स्थानिक नागरिक व सामाजिक संघटना, परतूर तालुकाआता तरी सार्वजनिक बांधकाम विभाग आणि संबंधित प्रशासन या भ्रष्ट गुत्तेदारावर कारवाई करून रस्त्याचे काम युद्धपातळीवर सुरू करणार की आणखी एखाद्या मोठ्या अपघाताची आणि जीवितहानीची वाट पाहणार ? असा संतप्त सवाल या निमित्ताने उपस्थित होत आहे.

# भव्य संत पूजन सोहळा अत्यंत उत्साहपूर्ण, भक्तिमय आणि आध्यात्मिक वातावरणात संपन्न

बदनापुर-( प्रतिनिधी) पवित्र पुरूषोत्तम मासा निमित्त आयोजित करण्यात आलेल्या संत पुजन या कार्यक्रमास विविध क्षेत्रातील संत-महंत, भाविक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.या

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन करून करण्यात आली. त्यानंतर भगवान श्री पांडुरंगाच्या मूर्तीचे विधिवत पूजन करून सर्वांच्या सुख-समृद्धी, आरोग्य व कल्याणासाठी प्रार्थना करण्यात आली. पुरुषोत्तम मास हा भक्ती, साधना, दानधर्म आणि आत्मचिंतनाचा पवित्र कालखंड मानला जातो. या पवित्र पर्वानिमित्त आयोजित संत पूजन सोहळ्यामुळे परिसरात अध्यात्मिक चैतन्य निर्माण झाले.



यावेळी ह.भ.प. पंढरीनाथ नाना तावरे महाराज, परमपूज्य पवन भारती खंडेश्वरी बाबा, आत्मानंद स्वामी महाराज (श्री दत्त संस्थान, ताडहादगाव), ह.भ.प. किसन महाराज काजळकर, ह.भ.प. केदारनाथ महाराज टेकाळे (पांगरखेडा), ह.भ.प. संतोष महाराज आढावणे, महंत शेवलीकर मोठे बाबा महानुभाव आश्रम बदनापूर, शालिगिरी १००८ भोले बाबा, गायत्री दीदी (दत्ताश्रम, रामनगर तांडा) ह भ प नामदेव महाराज शिंदे देवमूनेश्वर संस्थान देमणी वाहेगाव, शिवाजी महाराज शिंदे, रमेश महाराज लहाने, प्रल्हाद महाराज कान्हेरे, दादा महाराज पाटील , गजानन महाराज देठे, बाबासाहेब महाराज शिंदे,तसेच उपस्थित सर्व संत-महंतांचे पुष्पहार, शाल व श्रीफळ देऊन पूजन करण्यात आले. यावेळी संतांच्या पवित्र हस्ते आशीर्वाद घेण्याचा लाभ मिळाला.संतांनी आपल्या मार्गदर्शनातून समाजात सदाचार, संस्कार, सेवा, भक्ती आणि मानवतेची मूल्ये जपण्याचे आवाहन केले. संतांचा सहवास हा समाजाला योग्य दिशा देणारा असून त्यांच्या विचारांमधून समाजात सकारात्मक परिवर्तन घडत असते. संतांच्या कृपाशीर्वादामुळे समाजात शांतता, एकात्मता आणि बंधुभाव वृद्धिंगत होतो, असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

पुरुषोत्तम मासाच्या या पुण्यपर्वात संतांचे दर्शन, पूजन व आशीर्वाद घेण्याचा योग लाभणे ही अत्यंत भाग्याची बाब असून या सोहळ्यामुळे उपस्थित भाविकांच्या मनात भक्तीभाव अधिक दृढ झाला. संतांच्या कृपेने सर्वांच्या जीवनात सुख, शांती, समृद्धी, उत्तम आरोग्य आणि आध्यात्मिक उन्नती लाभो, तसेच समाजात सद्भावना व सौहार्द कायम राहो, हीच श्री विठ्ठल-रुक्मिणी चरणी प्रार्थना.करून आमदार नारायण कुंचे यांनी सर्व संतांचे आशिर्वाद घेतले

# आष्टीतील देशी दारू दुकानाविरोधात वंचित बहुजन आघाडीचा एल्गार आज १५ जून रोजी धरणे आंदोलन

## प्रशासनाला दिला थेट इशारा

परतूर प्रतिनिधी :-

परतूर तालुक्यातील आष्टी येथे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ८२ लगत सुरू असलेल्या देशी दारू दुकानाविरोधात वंचित बहुजन आघाडीने आता संघर्षाची धार अधिक तीक्ष्ण केली असून आज १५ जून २०२६ रोजी धरणे आंदोलन छेडण्यात येणार आहे. दारू दुकानामुळे परिसरातील सामाजिक वातावरण बिघडत असून महिला नागरिक व युवकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत असल्याचा आरोप करत वंचित बहुजन आघाडीने प्रशासनाविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे.

वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष गणेश वैद्य यांनी पोलीस प्रशासनाला निवेदन देत संबंधित देशी दारू दुकानावर तात्काळ कारवाई करण्याची मागणी केली आहे. अनेक वेळा तक्रारी निवेदने आणि पाठपुरावा करूनही प्रशासनाने कोणतीही ठोस कारवाई न केल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली असल्याचे त्यांनी म्हटले आहे.निवेदनांनंतरही कारवाई नाही आंदोलनाशिवाय पर्याय उरला नाही

वंचित बहुजन आघाडीच्या म्हणण्यानुसार यापूर्वी जिल्हाधिकारी पोलीस प्रशासन राज्य उत्पादन शुल्क विभाग तसेच इतर शासकीय कार्यालयांना वारंवार निवेदने देण्यात आली. मात्र प्रशासनाच्या उदासीन भूमिकेमुळे दारू दुकानाचा प्रश्न जैसे थे राहिल्याचा आरोप करण्यात आला आहे.गणेश वैद्य यांनी स्पष्ट शब्दांत इशारा देत सांगितले की जनतेच्या भावना, सामाजिक स्वास्थ्य आणि युवकांच्या भविष्याशी खेळ करणाऱ्या या दारू दुकानावर तात्काळ कारवाई झाली नाही तर आंदोलन आणखी तीव्र करण्यात येईल. आंदोलनादरम्यान कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी प्रशासनाची राहील.

दारू दुकान बंद करण्याच्या मागणीला नागरिकांचा वाढता पाठिंबा आष्टी गावातील अनेक नागरिक महिला आणि सामाजिक संघटनांनीही या आंदोलनाला उघड पाठिंबा दर्शविला आहे. दारू विक्रीमुळे गावातील शांतता सामाजिक वातावरण आणि युवकांचे भविष्य धोक्यात येत असल्याने संबंधित दुकान कायमस्वरूपी बंद करण्याची मागणी जोर धरत आहे.संघर्षाचा इशारा

वंचित बहुजन आघाडीने प्रशासनाला अंतिम इशारा देत स्पष्ट केले आहे की जनतेचा संयम आता संपत चालला आहे. न्याय मिळेपर्यंत आणि दारू दुकानावर कारवाई होईपर्यंत संघर्ष थांबणार नाही.

आष्टीतील या आंदोलनामुळे प्रशासनाची भूमिका काय राहणार आणि दारू दुकानाच्या प्रश्नावर कोणता निर्णय घेतला जाणार याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# गावच्या राजकारणावरून दोघांनी स्मशानभूमीतच केली हाणामारी

अंबाजोगाई-प्रतिनिधी:--

केज-गावच्या राजकारणावरून झालेल्या वादातून स्मशानभूमीतच दोन व्यक्तींमध्ये जोरदार हाणामारी झाल्याची घटना केज तालुक्यातील चिंचोली माळी येथे घडली आहे. १० जून रोजी दुपारी १ वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली असून, याप्रकरणी केज पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

चिंचोली माळी येथील रहिवासी हेमंत श्रीपती घोडके हे गावाशेजारील स्मशानभूमीजवळ असलेल्या चिंचेच्या झाडाच्या सावलीत बसले होते. त्याच वेळी गावातील तुकाराम दादाराव गालफाडे तेथे आले. दोघांमध्ये गावच्या राजकारणावर चर्चा सुरू असताना अचानक वाद उफाळून आला. वादाचे रूपांतर शिवीगाळीत झाले. हेमंत यांनी शिवीगाळ करण्यास विरोध केला असता, संतप्त झालेल्या तुकाराम यांनी त्यांना चापटबुक्क्यांनी मारहाण करण्यास सुरुवात केली. एवढ्यावरच न थांबता तुकाराम यांनी लाकडाने हेमंत यांच्या हातावर आणि पायावर बेदम प्रहार केले. या मारहाणीत हेमंत जखमी झाले.

या घटनेमुळे शांत असलेल्या ग्रामीण भागात राजकारणाचा विळखा किती घट्ट आणि उग्र झाला आहे, याचे विदारक चित्र समोर आले आहे. हेमंत घोडके यांनी दिलेल्या तक्रारीवरून केज पोलिसांनी संशयित आरोपी तुकाराम गालफाडे याच्याविरुद्ध गुन्हा रजि. नं. ३६८/२०२६, भारतीय न्याय संहिता कलम ११५(२), ११८(१), ३५१(२), ३५२ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक बाबासाहेब बांगर करत आहेत.

# आष्टीतील देशी दारू दुकान ठरतंय उपद्रवाचे केंद्र नागरिकांमध्ये संताप कारवाईची जोरदार मागणी

दारूच्या नशेत टिपू सुलतान चौकात काठ्यांनी तुफान हाणामारी प्रशासन झोपेत का ?

जालना प्रतिनिधी :- परतुर तालुक्यातील आष्टी येथील देशी दारू दुकानामुळे परिसरातील नागरिक महिला आणि विद्यार्थ्यांचे जीवन अक्षरशः त्रस्त झाले असून दारूच्या नशेत होणारे वाद शिवीगाळ मारामाऱ्या आणि दहशतीचे प्रकार दिवसेंदिवस वाढत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संतापाची भावना निर्माण झाली आहे.ताज्या घटनेत देशी दारू दुकानासमोर दारू प्राशन केलेल्या दोन व्यक्तींमध्ये वाद होऊन तो थेट टिपू सुलतान चौकात पोहोचला.दोघांनी एकमेकांवर काठ्यांनी तुफान हल्ला करत भररस्त्यात हाणामारी केली.या घटनेमुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. सुदैवाने मोठी जीवितहानी टळली मात्र या घटनेने नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

नुकत्याच मंठा येथे घडलेल्या गंभीर घटनेची चर्चा अद्याप शांत झालेली नसताना आष्टीतही अशाच प्रकारे दारूमुळे हिंसक घटना घडत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.मंठ्यासारखी दुर्दैवी घटना आष्टीत घडण्याची प्रशासन वाट पाहत आहे का ? असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.स्थानिकांच्या म्हणण्यानुसार देशी दारू दुकानासमोर रोजच मद्यपींचा अड्डा भरत असून दारू पिऊन रस्त्यावरच अश्लील भाषेत शिवीगाळ आरडाओरड महिलांची छेडछाडसदृश वर्तन तसेच भांडणे सुरू असतात. यामुळे शाळेत जाणाऱ्या विद्यार्थी-विद्यार्थिनी आणि माता-भगिनींना मोठा मानसिक त्रास सहन करावा लागत आहे.

विशेष म्हणजे या सर्व प्रकारांकडे स्थानिक पोलीस प्रशासन केवळ बघ्याची भूमिका घेत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. दारू दुकानावर कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने विविध चर्चांना उधाण आले असून दारू दुकानदाराकडून काहींना मलिदा मिळत असल्याची चर्चा परिसरात रंगू लागली आहे. या चर्चांमुळे पोलीस प्रशासनाच्या कार्यपद्धतीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

आष्टीतील नागरिकांनी जिल्हा प्रशासन, राज्य उत्पादन शुल्क विभाग आणि पोलीस विभागाने तातडीने या देशी दारू दुकानाची चौकशी करून आवश्यक ती कठोर कारवाई करावी अशी मागणी केली आहे.अन्यथा नागरिकांच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

आष्टीत कायदा-सुव्यवस्था राखायची की दारुड्यांच्या दहशतीला मोकळे रान द्यायचे ?

हा प्रश्न आता प्रत्येक नागरिकाच्या मनात निर्माण झाला असून प्रशासनाने वेळेत जागे होण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

# बालाजी सेलुकर पाटील यांचे निधन

नवीन नांदेड: गोपाळचावडी (ता. जि. नांदेड) येथील जेष्ठ नागरिक बालाजी भाऊराव सेलुकर पाटील यांचे वयाच्या ६५ वर्षे त्यांचे राहते घर गोपाळचावडी येथे दि १४ जून रोजी पहाटे ३ च्या दरम्यान हृदयविकाराच्या तिव्र झटक्याने निधन झाले. त्यांच्या पार्थिव देहावर रविवारी सायंकाळी ६ वाजता गोपाळचावडी येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना, एक मुलगी, जावई व नातवंडे असा परिवार आहे. बालाजी पाटील यांचा स्वभाव मनमोकळा व मनमिळावु असल्यामुळे त्यांना अचानक हृदय विकाराच्या तिव्र झटक्याने निधन झाल्या बद्दल गावातील अनेक जेष्ठ नागरीकांसह



ग्रामस्थांनी दुख व्यक्त केला जात होता

त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना, एक मुलगी, जावई व नातवंडे असा परिवार आहे ते गोपाळचावडी येथील ग्राम पंचायतचे उपसरपंच साहेबराव सेलूकर पाटील यांचे ते वडील होते.

# विष्णुपुरी ग्रामपंचायत निवडणूक साठी ५ वार्डतील १५ जागेसाठी आरक्षण सोडत, आठ जागा महिलांसाठी..

नवीन नांदेड -नांदेड तालुक्यातील सर्वात मोठ्या असलेल्या विष्णुपुरी ग्रामपंचायत निवडणूक साठी तहसीलदार संजय वारकड यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळ अधिकारी येलमाटे यांच्या उपस्थितीत ग्रामपंचायत कार्यालय विष्णुपुरी येथे १५ जागेसाठी आरक्षण सोडत काढण्यात आली यावेळी आजी माजी पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.सरपंच पद हे सर्वसाधारण पुरूषांसाठी सोडण्यात आले असून पंधरा पैकी आठ जागा महिलांसाठी सोडण्यात आल्या आहेत.

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या अधिपत्याखाली उपविभागीय अधिकारी डॉ.सचिन खल्लाळ यांच्या आदेशानुसार नांदेड तहसीलदार संजय वारकड यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळ अधिकारी येलमाटे , तलाठी रमेश गिरी,ग्रामसेवक संजय कानोडे ग्रामपंचायत कर्मचारी संतोष हंबर्डे, उग्रसेन हंबर्डे यांच्या उपस्थितीत जनगणना २०११ नुसार विष्णुपुरी येथील लोकसंख्या ८००० नुसार पाच वार्ड साठी पंधरा जागेसाठी आरक्षण सोडत काढण्यात आली.

यावेळी सरपंच प्रतिनिधी राजु हंबर्डे, ऊपसरपंच प्रतिनिधी विश्वनाथ हंबर्डे, सेवानिवृत्त उपनिरीक्षक माणिकराव हंबर्डे, शिवाजी हंबर्डे, यांच्या सह आजी माजी ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी वार्ड क्रमांक १ मध्ये एससी महिला राखीव, सर्व साधारण महिला, सर्वसाधारण वार्ड क्रमांक २ एससी सर्वसाधारण, ओबीसी सर्व साधारण,



सर्वसाधारण महिला, वार्ड क्रमांक ३ एससी महिला राखीव,नामाप्र महिला राखीव, सर्वसाधारण, वार्ड क्रमांक ४ सर्वसाधारण महिला, सर्वसाधारण, सर्वसाधारण, वार्ड क्रमांक ५ सर्व साधारण, ओबीसी महिला राखीव, सर्वसाधारण महिला राखीव पंधरा जागेसाठी आरक्षण सोडत आली आहे. सरपंच पद हे सर्वसाधारण पुरूषांसाठी सोडण्यात आले असल्यामुळे आगामी निवडणुक अटीतटीची होणार असल्याचे समजते.ग्रामीण पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कर्मचारी यांनी कडेकोट बंदोबस्त ठेवला होता, पोलीस पाटील प्रविण हंबर्डे यांच्याही यावेळी उपस्थितीती होती,आरक्षण सोडत विध्यार्थी यांच्या हस्ते चिठ्ठी टाकुन काढण्यात आली होती.

# अंबाजोगाई-आपेगाव रस्त्याची भयानक अवस्था

## ७-८ किलोमीटरमध्ये १५०० खड्डे, प्रवाशांची गैरसोय व एसटी सेवा बंद करण्यात आली आहे

अंबाजोगाई, प्रतिनिधी :

अंबाजोगाई ते आपेगाव या महत्त्वाच्या जिल्हा परिषद रस्त्याची अवस्था अत्यंत दयनीय झाली असून अवघ्या ७ ते ८ किलोमीटरच्या अंतरात तब्बल १५०० हून अधिक खड्डे पडल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. खड्ड्यांमुळे वाहनधारकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत असून अपघातांचा धोका दिवसेंदिवस वाढत आहे.

ऐन पावसाळ्याच्या तोंडावर आता ही अवस्था आहे तर भर पावसाळ्यात काय अवस्था होईल खड्ड्यांच्या विळख्यात अंबाजोगाई-आपेगाव रस्ता; ७ ते ८ किलोमीटरमध्ये तब्बल १५०० खड्डे, नागरिकांचा संताप



शाळकरी विद्यार्थी बससेवा बंद करण्यात आली आहे, वाहनधारक व प्रवाशांचा जीव धोक्यात; हिवरा खुर्द, सोमनाथ बोरगाव, धानोरा, माकेगाव, कानडी बदन आपेगाव यांसह परिसरातील अनेक गावांना जोडणारा हा प्रमुख मार्ग पुढे लातूर महामार्गाला जोडतो. या रस्त्यावरून दररोज शेतकरी, कामगार, नोकरी करणारे नागरिक, शाळकरी मुले, महाविद्यालयीन विद्यार्थी व अनेक वाहनधारकांचा प्रवास सुरू असतो. मात्र रस्त्यावरील मोठमोठ्या खड्ड्यांमुळे त्यांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

रस्त्याची दुरवस्था इतकी गंभीर झाली आहे की काही भागात विद्यार्थ्यांच्या प्रवासाच्या अडचणीमुळे महामंडळाच्या बससेवा बंद करण्यात आली आहे महामंडळानी सुद्धा ऐनवेळी पाठफिरवली अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असून याला जबाबदार कोण, असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत.

विशेष म्हणजे निवडणुकीच्या काळात याच मार्गावरील विकासाची आश्वासने देणारे लोकप्रतिनिधी व संबंधित प्रशासनाचे अधिकारी या रस्त्याच्या प्रश्नाकडे जाणून बुजून दुर्लक्ष करत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. पावसाळ्यात परिस्थिती आणखी गंभीर बनली असून दुचाकीस्वारांना खड्डे चुकवताना तोल जाऊन अपघात होण्याच्या घटना घडत आहेत. चारचाकी वाहनांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे.

स्थानिक नागरिकांनी अनेक वेळा संबंधित प्रशासनाकडे तक्रारी करूनही अद्याप ठोस दुरुस्तीचे काम सुरू झाले नसल्याची नाराजी व्यक्त केली आहे.या खड्डेमय रस्त्यावरून प्रवास करताना प्रत्येकवेळी जीव मुठीत धरावा लागतो. प्रशासनाने तातडीने रस्त्याची दुरुस्ती करावी, अन्यथा सर्व गावकरी व वाहनधारकांना आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल, असा इशारा नागरिकांनी दिला आहे.



# आडस-अंबाजोगाई मार्गावर जळालेली कार अपघातास कारणीभूत ठरण्याची भीती

## वाहन हटविण्याची नागरिकांची मागणी

केज/प्रतिनिधी

आडस-अंबाजोगाई रोडवरील शिवगड संस्थान उमराई परिसरा पासून काही अंतरावर एक कार जळालेल्या अवस्थेत रस्त्याच्या कडेला उभी असल्याचे दिसून येत आहे.हे वाहन अनेक दिवसांपासून त्याचठिकाणी असल्याने वाहनचालक व नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.रस्त्यालगत उभ्या असलेल्या याजळालेल्या कारमुळे रात्रीच्या वेळी किंवा भरधाव वेगाने येणाऱ्या वाहनांना अडथळा निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे भविष्यात गंभीर अपघात घडू शकतो, अशी भीती स्थानिक नागरिक व्यक्त करीत आहेत.संबंधित प्रशासनाने या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन रस्त्याच्या कडेला उभे असलेले जळालेले वाहन हटवावे, अशी मागणी नागरिकांतून होत आहे. वेळेत कारवाई झाल्यास संभाव्य अपघात टाळण्यासाठी मदत होईल,असेही नागरिकांनी प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.



# अनिल वैरागे,गौतम खंडागळे यांच्यासह बीड जिल्ह्यातील तीनजण कलावंत कलारत्न पुरस्काराने सन्मानित

केज/प्रतिनिधी

एकता सेवाभावी संस्था महाराष्ट्र आयोजित जीवन गौरव,राष्ट्रीय एकतारत्न,समाज रत्न, कलारत्न व राष्ट्रीय शिक्षणरत्न पुरस्कार वितरण सोहळा दि.११ जून २०२६ रोजी मराठी पत्रकार भवन म.न.पा मार्ग आझाद मैदान मुंबई या ठिकाणी प्रतिष्ठित मान्यवरांच्या उपस्थितीत हा सोहळा संपन्न झाला. या पुरस्कार वितरण सोहळ्यासाठी प्रमुख उपस्थिती व सहकार मंत्री महा.राज्य मुंबई मा.ना.बाबासाहेब पाटील तसेच मा.आ. विक्रमजी काळे शिक्षण आमदार छत्रपती संभाजीनगर यांच्या शुभहस्ते हे पुरस्कार ५७ व्यक्तींना देण्यात आला तसेच मा.सुधाकर जी शर्मा ज्येष्ठ गीतकार बॉलीवूड मुंबई तसेच मा. अली खान सिने अभिनेते बॉलिवूड मुंबई मा.सय्यद अली मुंबई विभाग अध्यक्ष एकता सेवाभावी संस्था यांची देखील उपस्थितीत होती.या सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत हा सोहळा अगदी मोठ्या थाटामाटात संपन्न झाला हा पुरस्कार विविध क्षेत्रातील पारंगत व्यक्तींना देण्यात आला यामध्ये श्री.अनिल वैरागे, गौतमजी खंडागळे व बीड जिल्ह्यातील गायिका ललिता लांडगे निशा उजगरे यांना कला क्षेत्रातील कलारत्न हा पुरस्कार देण्यात आला तर सुनीता बोधने यांना कलासमाज रत्न पुरस्कार देण्यात आला यावेळी मा.सहकार मंत्री बाबासाहेब पाटील व आमदार विक्रम जी काळे यांनी आलेल्या सर्व पुरस्कार विजेत्यांचे शब्द सुमनाने स्वागत करून त्यांना पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

# बाळराजे पवार यांची कॉर्नर सभा तर यशराज पंडिताची प्रचार फेरी : मतदारांचा मोठा प्रतिसाद

गेवराई : भारतीय जनता पक्षाच्या वार्ड क्रमांक अकराच्या उमेदवारांसाठी भाजपा नेते बाळराजे पवार यांनी शुक्रवारी ता.१२ रोजी अचानक नगर येथे कॉर्नर सभा घेतली, तर युवा नेते यशराज पंडित यांनी प्रचार रॅली काढून भाजपाच्या दोन्ही उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन केले. वार्ड क्रमांक अकराच्या मतदारांनी चांगला प्रतिसाद दिला असून, विकासाचे मागे उभे राहण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

गेवराई नगर परिषदेच्या वार्ड क्रमांक अकराच्या पोटनिवडणूकी साठी प्रचाराला प्रारंभ झाला असून, २० जून रोजी मतदान होत असलेल्या या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाचे अधिकृत उमेदवार राहुल जिजा खंडागळे, सायमा आकेफ काझी यांच्या प्रचारार्थ शुक्रवार ता. १२ रोजी सायंकाळी सहा वाजता अचानक नगर येथे कॉर्नर सभा पार पडली. या सभेत बोलताना पवार म्हणाले की, गेवराई शहराच्या सर्वांगीण विकासात वार्ड



क्रमांक अकरा च्या मतदारांची साथ महत्त्वाची गोष्ट आहे. आपले दोन्ही उमेदवार मोठ्या मताने निवडून द्या, तुमच्या समस्या जाणून घेऊन, त्या पोटतिडीकीने सोडविण्यासाठी राहुल जिजा व आकेफ काझी सक्षम उमेदवार दिले आहेत. तुमच्या आशीर्वादाने

नगर परिषदेवर आपलीच सत्ता असून, त्या सत्तेचा गोरगरीब समाजातील विविध घटकांना करून द्यायचा आहे. भारतीय जनता पक्ष विकासात कुठेही कमी पडणार नाही. तुम्ही निवडणुकीत आमच्या उमेदवारांना साथ द्या, तुमचे आशीर्वाद रूपी मतदान द्या, असे आवाहन ही बाळराजे पवार यांनी शेवटी बोलताना केले आहे. तसेच, युवा नेते यशराज पंडित यांनी अचानक नगर, जायकवाडी वसाहत, तय्यब नगर येथील मतदारांच्या भेटी गाठी घेऊन भाजपाचे अधिकृत उमेदवार राहुल जिजा, आकेफ काझी यांना निवडून देण्याचे आवाहन केले. मतदारांनी प्रचार फेरीला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आहे. तसेच, तय्यब नगर येथील भाजपा उमेदवारांच्या प्रचार कार्यालयाचे उद्घाटन भारतीय जनता पक्षाचे नेते बाळराजे पवार, युवा नेते यशराज पंडित यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. यावेळी उपनगराध्यक्ष ड. घुंबार्डे , गटनेते राजेंद्र राक्षसभूवनकर, माजी नगराध्यक्ष सुशील जवंजाळ, एजाज भाई मेंबर, शेख बाबु भाई, सभापती सय्यद बद्दुशेठ, सभापती शहेदाद भाई, पाशाभाई, शेख मुखीद टेलर, सय्यद इस्माईल वली, सय्यद माजेद, बबलू खराडे, मुनाफ राज, राजू पठाण, शेख रईस, शोयब आत्तार,

संजू पवार, मंन्सूर मामू, शिवाजी गायकवाड, अनिसभाई डांगे, शोयब भाई फिटर, पापाभाई डांगे, राजा पठाण,किशोर शेरकर, किशोर चौरे, शिवाजी काळे, सोमनाथ कानगुडे, शेख मुजीब यांच्यासह मतदारांची उपस्थिती होती.

## आनंद गायकवाड यांनी एम.लिब व आय एस्सी साठी

# सादर केला प्रकल्प अहवाल व शोधनिबंध

केज/ प्रतिनिधी

आनंद वसुदेवराव गायकवाड यांनी २०२५ - २०२६ या वर्षासाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक विद्यापिठात स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालय, अंबाजोगाई येथील अभ्यास केंद्रातून प्रकल्प अहवाल व शोधनिबंध सादर केला आहे.

आनंदगांव येथील स्वानंद सार्वजनिक वाचनालया चा शासकिय अनुदानातून आणि वाचक वर्गणीतून झालेला विकास : एक अभ्यास या विषयावर ११७ पानी प्रकल्प सादर अहवाल केला.यात प्रामुख्याने २०१५-१६ ते २०२४ - २५ चा १० वर्षाचा आढावा घेतलेला आहे.यासाठी त्यांना मार्गदर्शक म्हणून प्रा.डॉ. भाऊराव मुंडे हे लाभले. त्यांच्याच मार्गदर्शनात आनंद भैय्या वसुदेवराव गायकवाड यांनी अतिशय अभ्यासू असा ११७ पानी प्रकल्प यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांना सादर केला.केंद्र संयोजक प्रा. डॉ.पी.सी.गारेकर यांनी ही यासाठी मोलाचे मार्गदर्शन केले तसेच बहिस्थ परिक्षक म्हणून प्रा.मिश्रा,प्रा.डॉ.मधुबाला तसचे प्रा.डॉ.काकडे यांचेही मागदर्शन लाभले.तसेच स्वानंद सार्वजनिकवाचनालयाचे संस्थापक डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड यांनी १० वर्षाची माहिती ग्रंथालयाची माहिती देवून मार्गदर्शनही केले. तसेच स्वानंदसार्वजनिक वाचनालयातील ३५५ वाचकां पैकी १०० वाचकांच्या प्रश्नावली प्रत्यक्ष वाचनालयात बाल वाचक,महिला वाचक,प्रौढ वाचक यांच्याकडून प्रत्यक्ष भरून घेवून हा प्रकल्प अहवाल पूर्ण करता आला.१०० वाचक सभासदांनी प्रत्यक्ष प्रश्नावली भरून देवून मदत केली.त्यांचेही आभार आनंद भैय्या गायकवाड यांनी मानले आहेत.ग्रंथालय आणि माहितीशास्त्र या पदव्युत्तर पदवी (मास्टर डिग्री)याकामी प्रकल्प पूर्ण करण्यासाठी सहकार्य केले त्या सर्वांचे आभार व्यक्त करण्यात आले आहेत.ज्ञानाधिष्ठीत समाजासाठी ग्रंथालय शास्त्राच्या पाच सिद्धांताची उपयुक्तता या विषयावर १२ पानी अभासू असा शोधनिबंध यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांना याच मास्टर डिग्रीसाठी पदव्युत्तर पदवी साठी सादर केला.यासाठीही वरील सर्व तज्ञ प्रा.डॉ.व स्वानंद सार्वजनिक वाचनालय,आनंदगांव ता.केज.जि.बीड चे संस्थापक अध्यक्ष,जेष्ठ विचारवंत व जेष्ठ समाज सेवक डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड यांचे मार्गदर्शन लाभले आहे.

प्रकल्प व शोध निबंधाचे अभ्यासक आनंद वसुदेव राव गायकवाड यांनी सर्वांचे आभार मानले आहेत.



# माजलगाव शहरातील मुख्य रस्ता व बायपास रस्ता अतिक्रमण मुक्त करा - अँड.अमोल डोंगरे

माजलगाव : शहरातील मुख्य रस्ता, बायपास रस्ता व त्यास जोडून असलेली मार्ग वितरकेवर माजलगाव शहारातील मोठ मोठ्या व छोट्या व्यापारी दुकानदारांनी अतिक्रमण करून शहरातील मुख्य रस्ता व बायपास रस्ता अतिक्रमण करून व्यापून टाकलेला रस्ता अतिक्रमण मुक्त करावा असे निवेदन बहुजन समाज पार्टी चे बीड जिल्हा प्रभारी अँड. अमोल डोंगरे यांनी उपविभागीय अधिकारी व मुख्याधिकारी नगर परिषद माजलगाव यांना दिले आहे.

असे की, माजलगाव शहरात प्रवेश करण्यासाठी पुर्व दिशेने सिंधफना नदिमार्ग व केसापुरी कँम्प कडू येणारा पश्चिम दिशा मार्ग असा एक प्रमुख रस्ता आहे तर दुसरा रस्ता शहराच्या बाहेरून येणारा बायपास रस्ता आहे असे प्रमुख दोन रस्ते आहेत या रस्त्यांना दोन्ही बाजुने मार्ग वितरीका आहेत. या रस्त्याच्या लगत मोठ - मोठी शॉपींग दुकाने, बँका, दवाखाणे उभारलेले आहेत. त्या शॉपींग दुकान,,बँक, हॉटेल,चालकांनी आपल्या दुकानात येणाऱ्या ग्राहकास चार चाकी, दुचाकी वाहने उभी करण्यासाठी वाहनतळाची व्यवस्था केली नसल्यामुळे खरेदीसाठी येणारे ग्राहक हे शहरात असलेला दुतर्फा मुख्य रस्ता दोन पदरी आहे. दोन्ही बाजुच्या एक पदरी रस्त्यावर चार चाकी, दुचाकी वाहने बेकायदा उभी करून पूर्णतः अतिक्रमण करून कायम व्यापलेला असतो रस्त्यालगत असलेली मार्गवितरिकेवर दुकानाचे जाहिरात फलक लावले असल्याने शहरात येणारे चार चाकीवाहन,दुचाकीस्वार, पादचारी, वृद्ध,महिला, विद्यार्थ्यांना कमालीची कसरत करावी लागते त्याच मुख्य रस्त्यावर फळवाल्यांचे गाडे, चना फुटाणावाल्यांचे गाडे, चिकन सेंटर, चायनिज सेंटर, आईस्क्रिम गाडे, तसेच भाड्याने दिली जाणारी चार चाकी वाहने, माल वाहतुक करणारी वाहने, ट्रॅव्हल्स बेकायदेशीर दिवस - दिवसभर उभ्या केल्या जातात त्यामुळे मुख्य रस्यावरील दोन्ही बाजुचा एकपदरी रस्ता व मार्ग वितरीकावर अतिक्रम केल्यामुळे नागरिकांना आपला जिवमुठीत धरून चालावे लागते. तर छत्रपती संभाजी महाराज चौकातील सुखसागर हॉटेल, शुभम वडापाव, राजमुद्रा चहा हॉटेल, पंढरी चहा हॉटेल आणि बायपास रोडवरील उभारलेले दवाखाने या दवाखाण्यात इलाजासाठी येणारांची वाहणे रस्त्यातच उभी करून रस्ता जाम होत असल्याने नागरीकांचा गर्दितून मार्ग काढतांना छळ होत आहे. या बायपास रोडवरती नेहमी अपघात होत आले आहेत. यापुर्वी एक भिषण अपघात झाला होता. त्या भीषण अपघातात शालेय विद्यार्थ्याचा जागीच मृत्यू झालेला आहे. तरी माजलगाव शहरातील मुख्य रस्त्यावरील बेकायदा झालेले अतिक्रमण हटवून शहरवासियांना रस्ता सुरळीत कारन न्याय द्यावा. अन्यथा उपविभागीय अधिकारी, मुख्याधिकारी नगर परिषद, माजलगाव यांचे विरोधात लोकशाही मार्गाने बहुजन समाज पार्टी, माजलगाव यांच्या वतीने आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा निवेदनाद्वारे अँड. अमोल डोंगरे यांनी दिला आहे.